सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १०८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २० मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## सोशल मिडीया ॲप्सवरुन ज्योती मल्होत्रा गुप्त माहिती पाकिस्तान्यांना करीत होती शेअर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०हिसार हरियाणा**

देशद्रोही युट्यूबर ज्योती मल्होत्राबाबत धक्कादायक खुलासे होत आहेत. हेरगिरीबरोबरच भारतात तिला तीन कामे करण्यास सांगण्यात आले होते. हरियाणाच नाही तर देशभरात खळबळ उडविलेल्या या प्रकरणाची पाळेमुळे खोदून काढण्यात येत आहेत. पाकिस्तानीदहशतवादी कारवायांएवढ्याच ज्योती मल्होत्राला दिलेल्या टास्क या भयानक होत्या. ज्याचे परिणाम हळूहळू दिसू लागणार होते.

ज्योती ही दिल्लीपासून १७० किमी दूर असलेल्या हरियाणाच्या हिसारची राहणारी होती. ती पाकिस्तानच्या वळचणीला लागली होती. पाकिस्तानने ज्योतीचा भारताविरोधात वापर सुरु केला होता. तिला अशाप्रकारे पाकिस्तानच्या बाजुने करण्यात आले की ती येता-जाता पाकिस्तानने कोणतेही वाईट कृत्य केले तरी ती त्याचे समर्थन करू लागली होती. अशाप्रकारे तिचा एकप्रकारे ब्रेनवॉश करून तिला गुप्तहेर करत तिच्याच देशाविरोधात वापर करण्यास सुरुवात करण्यात आली होती.



पाकिस्तानने ज्योतीच्या मदतीने उत्तर भारतात मोठे नेटवर्क उभे केले होते. तिच्या चौकशीत एकेक धक्कादायक खुलासे होत आहेत. पाकिस्तानी अधिकारी दानिश, ज्याला भारताने देशातून जाण्यास सांगितले होते त्याच्याशीच ज्योतीचे जवळचे संबंध बनले होते. त्याने तिच्यासाठी वेगवेगळ्या देशांच्या टूर आयोजित केल्या होत्या, तसेच ज्योतीवर तीन कामे सोपविली होती. यामध्ये पहिले काम म्हणजे तीने तिच्या युट्यूब चॅनलवरून पाकिस्तानची एक सकारात्मक इमेज भारतीयांसमोर उभी करावी हे होते आणि ते ती करतही होती. दुसरे काम म्हणजे पाकिस्तानविरोधातील गोष्टींना बदलून सांगणे होते आणि तिसरे सर्वात धोकादायक म्हणजे तिच्या या टीममध्ये तिच्यासारखीच सोशल मीडिया, युट्यूब आदींवर काम करणाऱ्या इन्फ्लुएन्सरची भरती करणे होते.

अशाप्रकारे पाकिस्तानने ज्योतीच्या माध्यमातून सर्वाधिक पाहिल्या जाणाऱ्या सोशल मीडियावर पाय पसरण्यास सुरुवात केली होती. भारताविरोधात तिने मानसिक युद्ध छेडले होते. तिचे व्हिडीओ पाहून पाकिस्तान एवढाही वाईट नाही, किंवा जसा दाखविला जातो तसा नाही असे भारतीयांच्या मनावर बिंबविण्यात येत होते. दानिश येनकेनप्रकारे ज्योतीवर नियंत्रण मिळवत होता, असे तपास अधिकाऱ्यांशी संबंधीत सुत्रांनी द प्रिंटला सांगितले आहे.

ज्योती मल्होत्राबाबत चौकशीत अनेक धक्कादायक खुलासे होत आहेत. ज्योती कुमारी ६-७ जुलै रोजी सुलतानगंजमधील हॉटेल विजयमध्ये थांबली होती. घाट रोडवरील हॉटेल विजयमध्ये राहिल्यानंतर, अजगाईबीनाथ रेल्वे स्थानकासमोर रील बनवण्यात. तिने हॉटेलसमोर एक रीलही बनवली होती. पाकिस्तान उच्चायोगाच्या अधिकाऱ्यांना देशाची गोपनीय माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक झाल्यानंतर तिच्यावर सुरू झालेल्या तांत्रिक तपासात, ती भागलपूरमधील नाथनगरमध्ये सक्रिय असलेल्या एका धौंढीलशीच्या संपर्कात होती.


**पहलगाम हल्ल्यापूर्वी काश्मीर दौरा**

हिसार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या अगोदर ज्योती तिथे गेली होती, आणि त्यानंतर ती पाकिस्तान दौऱ्यावर रवाना झाली. पोलीस यामधील संबंध शोधत असून, ही यात्रा पूर्वनियोजित हेरगिरीचा भाग होती का, याचा तपास सुरू आहे.ज्योतीच्या पाकिस्तान दौऱ्यातील एका व्हिडिओमध्ये ती पाक नेत्या मरियम नवाजसोबत दिसते, ज्यामुळे अधिकच खळबळ उडाली आहे. तसेच, तिच्या विविध उच्चपदस्थ पाकिस्तानी अधिकाऱ्यांसोबतच्या भेटींचाही तपास केला जात आहे.

## पहलगाम हल्ल्याच्या ठिकाणाचे नाव बदलून 'शहीद हिंदू घाटी पर्यटन स्थळ' करा, उच्च न्यायालयात याचिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०जम्मू**

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयात मंगळवारी दाखल झालेली एक जनहित याचिका फेटाळण्यात आली. ही याचिका जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे घडलेल्या एका भीषण घटनेशी संबंधित होती. याचिकेत अशी मागणी करण्यात आली होती की, ज्या ठिकाणी दहशतवाद्यांनी धर्म विचारून २६ पर्यटकांची निर्घृण हत्या केली, त्या ठिकाणाला 'शहीद हिंदू घाटी पर्यटन स्थळ' असे नाव द्यावे. तसेच, या हल्ल्यात बळी पडलेल्या व्यक्तींना शहीदाचा दर्जा मिळावा, अशीही विनंती याचिकाकर्त्यांनी केली होती.




मुख्य न्यायाधीश शील नागू आणि न्यायमूर्ती सुमित गोयल यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळत स्पष्टपणे सांगितले की, अशा प्रकारचे निर्णय - म्हणजे एखाद्या ठिकाणाचे नाव बदलणे किंवा मृत व्यक्तींना शहीद घोषित करणे - हे पूर्णपणे सरकारच्या कार्यक्षेत्रात येते. न्यायालय यामध्ये हस्तक्षेप करू शकत नाही.

खंडपीठाने नमूद केले, स्मारक उभारणे, जागा जाहीर करणे किंवा तिचे नामकरण करणे हे सरकारचे काम आहे. याशिवाय, एखाद्या व्यक्तीस शहीद घोषित करणे देखील प्रशासनाचा निर्णय असतो. न्यायालय धोरण ठरवू शकत नाही, हे काम संसद किंवा संबंधित विधिमंडळाचे आहे.


तथापि, न्यायालयाने याचिकाकर्त्याला सल्ला दिला की तो या संदर्भात सरकारकडे अधिकृत निवेदन देऊ शकतो. सरकार त्याचा विचार कायदेशीर चौकटीत करून निर्णय घेऊ शकते. न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राबाहेर असलेल्या या विषयात न्यायालयाने स्वतःला दूर ठेवले.

## मदरशांत ऑपरेशन सिंदूरचे धडे शिकविले जाणार; उत्तराखंड सरकारचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०देहरादून**

सोमवारीच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ऑपरेशन सिंदूर, चांद्रयान मोहिमा या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याचे संकेत दिले होते. यावर पुढे जात उत्तराखंड सरकारने मदरशांमध्ये नवीन अभ्यासक्रमात 'ऑपरेशन सिंदूर' चा धडा जोडला जाणार असल्याची घोषणा केली आहे.

उत्तराखंडमध्ये ४५१ नोंदणीकृत मदरशे आहेत. यात जवळपास ५० हजार हून अधिक विद्यार्थी शिकतात. ऑपरेशन सिंदूरमुळे हे विद्यार्थी लहानपणापासूनच देशप्रेमाचे धडे गिरवणार आहेत. या विद्यार्थ्यांना देशभक्तीने भरलेल्या इतिहासाची ओळख करून दिली जाणार आहे. धामी सरकारचा हा निर्णय राष्ट्रवाद आणि लष्करी अभिमान यांना शिक्षणाशी जोडण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले जात आहे.




या उपक्रमामुळे मुलांचा अशा संशोधनाकडे कल वाढेल ज्यामुळे त्यांची राष्ट्रीय हितांबद्दलची ओढ वाढेल. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणात शालेय स्तरापासूनच मुलांमध्ये अशी बीजे रोवण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. याचबरोबर केंद्र सरकार चांद्रयानाचाही धडा या अभ्यासक्रमात जोडणार आहे. चांद्रयानासोबतच ऑपरेशन सिंदूर देखील आता लहान मुलांच्या हृदयात आहे. त्यांच्या तोंडी ब्रम्होस, आकाश मिसाईलचे नाव आहे. भारताने पाकिस्तानवर कसा हल्ला केला, आपल्या शूर जवानांनी काय काय पराक्रम केले हे त्यांना आता माहिती होणे गरजेचे आहे. याचा पुढील पिढी घडविण्यासाठी फायदा होणार आहे.

भारताने पाकिस्तानविरोधात तीन युद्धे लढली आहेत. या तिन्ही युद्धांत भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आहे. पाकिस्तानपासून बांगलादेश वेगळा केला आहे. या इतिहासासोबत भारताचा नवा इतिहासही नव्या पिढीला शिकविण्याची गरज आहे. सध्याचे ऑपरेशन सिंदूर या लहान मुलांच्या मनात आहे, यामुळे ते याचा अभ्यास अधिक गोडीने करतील अशी अपेक्षा शिक्षण तज्ञांना वाटत आहे.

## छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात पुन्हा समावेश

### चार कॅबिनेट मंत्री मिळाल्याने नाशिकमध्ये पालकमंत्री पदासाठी रस्सीखेच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि ओबीसी नेते छगन भुजबळ हे आज महायुती सरकारमध्ये कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेत आहेत. भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश असल्यानं नाशिक जिल्ह्याला चार कॅबिनेट मंत्रिपद मिळाले आहेत. मंत्रिमंडळात नाशिकचं पारडं जड असणार आहे. अशा स्थितीत जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या नाशिकच्या पालकमंत्री पदासाठी रस्सीखेच होणार आहे.



गेल्यावर्षी महायुतीनं विधानसभा निवडणुकीत घवघवीत यश मिळूनही छगन भुजबळांच्या मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला नव्हता. विधानसभा निवडणुकीत छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी बंडखोरी केल्यानं त्यांना वगळण्यात आल्याची राजकीय वर्तुळात चर्चा होती. मंत्रिमंडळात समावेश न झाल्यानं भुजबळ यांनी आपली नाराजीदेखील व्यक्त केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माझ्या मंत्रिपदासाठी आग्रह धरला होता. मात्र, आमच्याच पक्षातील काही नेत्यांनी माझं नाव वगळल्याचं म्हणत भुजबळांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर रोष व्यक्त केला. मात्र, त्यानंतर बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यावेळीच भुजबळांना मंत्री पद मिळेल अशी चर्चा होती. ती आता खरी ठरली आहे.

## भारताने ३ दिवसात पकडले ११ पाकिस्तानी हेर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक**

२२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर हेरगिरीच्या कारवायांमध्ये सहभागी असलेल्यांवर देशभरात कारवाई सुरू असताना , तीन दिवसांत, अनेक राज्यांमध्ये पाकिस्तानसाठी हेरगिरी करण्याच्या आरोपाखाली ११ जणांना अटक करण्यात आली आहे . भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेबद्दल आणि लष्कराबद्दलची संवेदनशील माहिती पाकिस्तानी कार्यकर्त्यांना दिल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी रंगेहाथ पकडलेल्या ११ जणांमध्ये एक युट्यूबर, सुरक्षा रक्षक आणि एक ॲप डेव्हलपर यांचा समावेश आहे. सर्वात प्रमुख अटक झालेल्यांमध्ये हरियाणातील ट्रॅव्हल व्लॉगर ज्योती मल्होत्रा होती, जिला संवेदनशील माहिती लीक केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या इतर आरोपींमध्ये विद्यार्थी, एक सुरक्षा रक्षक, सामान्य नागरिक आणि एक ॲप डेव्हलपर यांचा समावेश आहे.सर्व ११ अटक तीन राज्यांमध्ये झाली - हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेश. पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींची यादी येथे आहे

## राज्याचं नवं गृहनिर्माण धोरण जाहीर

### मंत्रिमंडळ बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात संपन्न झाली. आजच्या बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून राज्य सरकारने नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केलं आहे. 'माझे घर-माझे अधिकार' हे ब्रीद ठेवलं असून तब्बल ७० हजार कोटींची गुंतवणूक गृहनिर्माण खात्याच्या माध्यमातून केली जाणार आहे. तसेच, झोपडपट्टी पुनर्वसन ते पुनर्विकास असा सर्वांगीण कार्यक्रम देखील आखला जाईल. मंत्रिमंडळ बैठकीत जलसंपदा विभागात ४, विधी व न्याय विभागात एक, नगरविकास विभागात एक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागात एक आणि गृहनिर्माण विभागात एक असे एकूण ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.




राज्यातील ओबीसी नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार छगन भुजबळ यांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे, त्यांच्या शपथविधी सोहळ्यानंतर पार पडलेल्या या बैठकीत आज पहिल्यांदाच त्यांनी हजेरी लावल्याचं दिसून आलं. दरम्यान, अद्याप छगन भुजबळ यांना कुठलंही खातं देण्यात आलं नाही. मात्र, त्यांना अन्न व नागरी पुरवठा हे खातं दिलं जाऊ शकतं.




## संपादकीय ......

# पाकिस्तानचे आर्थिक लाड

*ऑपरेशन सिंदूरनंतर भारताची बाजू समर्थपणे जागतिक स्तरावर मांडण्यासाठी सात जणांच्या नेतृत्वात सर्वपक्षीय शिष्टमंडळाची घोषणा केंद्र सरकारने केली आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने अत्याधुनिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोनच्या साह्याने पाकिस्तानवर घणाघात केला. त्यात पाकच्या अनेक विमानतळांचे नुकसान झाले. अगोदरच भिकेकंगाल झालेल्या पाकिस्तानला दारोदारी मदतीची याचना करत फिरावे लागत आहे; मात्र पाकिस्तान हे दहशतवाद्यांचे माहेरघर असल्याचे सर्व जगाला ठाऊक आहे. रविवारी लष्कर- ए-तैयबाचा दहशतवादी रजाउल्ला निजामनी खालिद ऊर्फ अबू साईउल्लाला अज्ञात बंदूकधार्याने गोळ्या घातल्या. हा खालिद २००६ मध्ये संघाच्या मुख्यालयावर झालेल्या हल्ल्याचा मुख्य सूत्रधार होता. अजूनही असे अनेक दहशतवादी पाकिस्तानात मोकाट असून, आता तर हाफिझ सईदची सुटका व्हावी, अशी मागणी पाकिस्तानात तेथील सर्वपक्षीय बैठकीत करण्यात आली आहे.*

*दहशतवाद्यांना पोसण्याची पाकची खोड गेलेली नाही आणि तरीही आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) पाकिस्तानला अर्थसाह्य करतच आहे. अर्थात, पाकला निधीतील पुढील हप्ता देण्यापूर्वी आयएमएफने ११ नव्या अटी घातल्या आहेत. त्यामुळे पाकिस्तानवर घातलेल्या एकूण अटींची संख्या ५० झाली आहे. नव्या शर्तींमध्ये १७ हजार ६०० अब्ज रुपयांच्या अर्थसंकल्पाला संसदेची मंजुरी मिळवणे, वीज बिलांवरील कर्जफेड अधिभारात वाढ करणे तसेच ३ वर्षांहून अधिक जुन्या गाड्यांच्या आयातीवरील बंदी उठवणे वगैरे अटींचा समावेश आहे. अर्थसंकल्पात १०,७०० अब्ज रुपये हे विकासकामांसाठी बाजूला ठेवावे लागतील. तसेच नवीन कृषी उत्पन्न कर कायदे लागू करणे, रिटर्न प्रक्रिया, करदाता ओळख व नोंदणीसाठी जूनपर्यंत एक मंच स्थापन करणे आणि ऊर्जा क्षेत्राची पुनर्रचना करणे व २०२७ नंतरच्या वित्तीय क्षेत्रासाठी धोरणात्मक आराखडा तयार करणे अशी बंधने पाकिस्तानवर लादली आहेत; मात्र आयएमएफने पाकिस्तानला संरक्षणासाठी वाढीव निधी देण्याचे आश्वासनही दिले आहे.*

*पुढील आर्थिक वर्षासाठीचा पाकचा संरक्षण अर्थसंकल्प चालू वर्षापेक्षा १२ टक्क्यांनी अधिक, म्हणजे २,४१४ अब्ज रुपये इतका असावा, असे आयएमएफच्या अहवालात दर्शवले आहे; मात्र पाकिस्तान सरकारने अंदाजपत्रकाद्वारे संरक्षणासाठी १८ टक्के अधिक निधी देण्याचे ठरवले आहे. याचा अर्थ, संरक्षणाबाबत आयएमएफने केलेल्या सूचना पाकिस्तान उघडपणे धुडकावून लावत आहे. संरक्षण सामग्रीच्या नावाने दाखवलेला खर्च पाकिस्तान दहशतवाद्यांचे पालनपोषण करण्यासाठी वापरतो. आयएमएफकडून मिळणारा निधीही अशाचप्रकारे 'डायव्हर्ट' केला जातो. मागच्या आठवड्यात आयएमएफने पाकला १ अब्ज डॉलरचे बेलआऊट पॅकेज जाहीर केले आणि त्यानंतर आर्थिक सुधारणांच्या नावाखाली ७ अब्ज डॉलर्सच्या कर्जाच्या दुसर्या हप्त्यालाही मान्यता देण्यात आली. हा निधी सीमापार दहशतवादासाठी वापरला जाऊ शकतो. त्यामुळे पाकला कोणत्याही प्रकारे मदत करण्याची गरज नाही. उलट अर्थसाह्य करून आयएमएफ स्वतःची आणि देणगीदारांची प्रतिष्ठा धोक्यात आणत आहे, असे भारताने स्पष्टपणे म्हटले होते.१९५८ पासून पाकिस्तानने आतापर्यंत आयएमएफकडून २४ वेळा मदतीचे पॅकेज मिळवले आहे. भारताने जेव्हा जेव्हा जागतिक बँक वा आयएमएफकडून अर्थसाह्य घेतले, तेव्हा घातलेल्या जवळपास सर्व अटी-शर्तींचे पालन केले. इंदिरा गांधी यांच्या काळात असे कर्ज घेण्यात आले आणि त्यावेळी अर्थव्यवस्थेत संरचनात्मक सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रारंभिक पावले टाकण्यात आली. राजीव गांधी यांनी संगणक व दूरसंचार क्षेत्रांत क्रांती आणली. तसेच ग्राहकोपयोगी वस्तू व इलेक्ट्रॉनिक्सच्या आयातीवरील निर्बंध शिथिल केले.*

*मात्र पाकिस्तानने वारेमाप कर्जे व अन्य प्रकारची सवलतीची पॅकेजेस उकळूनही त्यांचा सदुपयोग केला नाही. पाकिस्तानचे सार्वजनिक उपक्रम, सरकारी प्रशासन यांच्या कारभारात रचनात्मक सुधारणा झालेल्याच नाहीत.*

# दरवर्षी पिक फेरपालट करणे गरजेचे आहे का? याचे शेतीला कसे होतात फायदे? वाचा सविस्तर




**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक**

पिक फेरपालट म्हणजे एकाच जमिनीत विविध हंगामांमध्ये विविध पिके पेरण्याची किंवा लागवडीची प्रक्रिया. यामध्ये विशिष्ट कालावधीत एकच पिक पुन्हा पुन्हा न घेता विविध पिकांची फेरपालट केली जाते.

या पिक फेरपालट पद्धतीचा उद्देश जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे आणि शेतीचे एकूण आरोग्य सुधारणे हा आहे.

दरवर्षी एकच पीक घेत राहिलात तर काय होईल?

- मातीतील एकाच प्रकारची अन्नद्रव्ये कमी होतात.
- जमिनीचा पोत बिघडतो.
- किडी-रोगांचे प्रमाण वाढते.
- उत्पादनात घट होते.

**कशी कराल पिक फेरपालट?**

- मुख्य पीक बदलताना त्याच्या मागील पिकाशी असलेले साम्य टाळा म्हणजेच पुन्हा पुन्हा तेच पिक घेऊ नका.

**कृषी विशेष**

- मुळांची खोली, पिकाची अन्नद्रव्यांची गरज, कीड-रोग प्रकार, आणि कालावधी यावर आधारित पिक फेरपालट केली तर त्याचा जमिनीला चांगला फायदा होऊन उतप्दन ही चांगले येते.

- एखाद्या हंगामात खादाड पिक घेतलं तर दुसऱ्या हंगामात चांगला बेवड असणारे पिक घ्यावे.

- विशेषतः कडधान्यांची पिके यात जास्त फायद्याची ठरतात.

**पिक फेरपालटीचे फायदे**

१) मातीचे आरोग्य सुधारते

वेगवेगळ्या पिकांची अन्नद्रव्य गरज वेगळी असते, त्यामुळे मातीतील संतुलन राखले जाते. पिक फेरपालट पद्धतीचा उद्देश जमिनीची सुपीकता टिकवून ठेवणे, तण आणि रोगांचा प्रादुर्भाव कमी करणे आणि शेतीचे एकूण आरोग्य सुधारणे हा आहे.

२) उत्पादनात वाढ व खर्चात बचत

मातीचा पोत सुधारल्याने उत्पादन वाढते आणि खतांचा खर्च कमी होतो.

३) किडी-रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो

एकाच प्रकारचे पीक घेतल्याने किडी/रोग स्थायिक होतात. पिक फेरपालट हे तोडते.पीक बदलताना त्याच्या मागील पिकाशी असलेले साम्य टाळा म्हणजेच पुन्हा पुन्हा तेच पिक घेऊ नका

४) आच्छादन आणि मुळांचा उपयोग

काही पिके (उदा. डाळवर्गीय) नत्र स्थिरीकरण करून पुढच्या पिकासाठी पोषक ठरतात.

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०




## फणसाचे अनोखे फायदे: हृदयाची काळजी घेते, शुगर, रक्तदाब नियंत्रित करते, हाडे मजबूत करते, रोगप्रतिकारशक्ती वाढवते

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

फणसाला भाजी म्हणावे की फळ, हे एक कन्फ्युजन आहे. याला तुम्ही काहीही समजा पण याचे फायदे बदलणार नाहीत. आहारतज्ञ डॉ अनू अग्रवाल यांच्याकडून फणस खाण्याचे फायदे आणि नुकसान जाणून घ्या. तसेच फणस कसा खावा आणि फणसाच्या बियांच्या फायद्यांविषयी जाणून घ्या...

फणसाचे फायदे फणस आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्याचे गुणधर्म आणि त्यात असलेले पोषण हे त्याला खास बनवते. तसेच, फणस हा कोणत्याही गंभीर आजारावर अजिबात इलाज नाही. हे फक्त त्या आजराची लक्षणे कमी करू शकते.

फणस भाजी की फळ फणस हे उष्णकटिबंधीय फळ आहे. याचे उत्पादन दक्षिण-पश्चिम भारतात जास्त आहे. फणसाचे शास्त्रीय नाव आर्टोकार्पस हेटेरो फिलस आहे. तीक्ष्ण आवरणाचे हे फळ जगातील सर्वात मोठ्या फळांमध्ये गणले जाते. पिकल्यावर हे फळ आतून पिवळे आणि गोड होते. हे फळच नाही तर याच्या बिया देखील आरोग्यासाठी फायदेशीर आहेत.

शरीरात कर्करोगाच्या पेशी तयार होण्यापासून रोखते कॅन्सरसारख्या आजारांपासून बचाव करण्यासाठी फणस (जॅकफ्रूट) हा रामबाण उपाय ठरू शकतो. लिग्नांस, आयसोफ्लाव्होन आणि सॅपोनिन्स सारख्या फायटोन्यूट्रिएंट्सने समृद्ध, फणसामध्ये कर्करोगविरोधी गुणधर्म असतात, जे शरीरात कर्करोगाच्या पेशी तयार होण्यास प्रतिबंध करतात. डायटरी फायबर असल्याने, फणस कोलन आणि पोटाचा कर्करोग प्रतिबंधित करते.

हृदयासाठी फायदेशीर हृदय निरोगी ठेवण्यासाठीही फणसाचे सेवन केले जाऊ शकते. जॅकफ्रूटमध्ये असलेले व्हिटॅमिन बी६ रक्तातील होमोसिस्टीनची पातळी कमी करण्यास मदत करते, ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. दुसरीकडे, फणस पोटॅशियमच्या प्रमाणामुळे रक्तदाब कमी करून हृदयविकाराचा झटका



देखील प्रतिबंधित करते.

रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी देखील फणसाचे सेवन फायदेशीर आहे. फणस खाल्ल्याने अँटिऑक्सिडेंट क्षमता आणि लॅक्टिक ॲसिड वाढते, ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. जॅकफ्रूटमध्ये व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी सारखे पोषक घटक असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी ओळखले जातात.

डायजेशन फणस हे फायबरचे चांगचे स्रोत मानले जाते. हे पचनासाठी महत्त्वाचे असते. फायबर बद्धकोष्ठता दूर करते. हे आतड्यांची चांगली स्वच्छता आणि पाचन तंत्रातून विषारी पदार्थ काढून टाकण्यास देखील मदत करते.

एनीमिया शरीरातील लोहाची कमतरता हे एनीमियाचे मुख्य कारण मानले जाते. जॅकफ्रूटमध्ये भरपूर लोह असते. त्यामुळे एनीमियासाठी डाएट चार्टमध्ये फणसाचा समावेश करणे फायदेशीर ठरते.

हाडे मजबूत करते हाडे मजबूत करण्यासाठी देखील फणसाचे फायदे आहेत. यामध्ये आढळणारे पोटॅशियम हाडांचे नुकसान होण्यापासून संरक्षण करू शकते. याशिवाय यामध्ये मॅग्नेशियमचे प्रमाणही चांगले असते. कॅल्शियम शोषण्यासाठी मॅग्नेशियम महत्त्वाचे मानले जाते आणि हाडे मजबूत करण्यास मदत करते. हे ऑस्टियोपोरोसिस टाळण्यास मदत करते.

थायरॉईड फणस कॉपरचा एक चांगला स्रोत आहे, जो थायरॉईड चयापचय तयार करण्यास मदत करतो. थायरॉईडच्या विकारांवरही कॉपर फायदेशीर आहे. हायपोथायरॉईडीझमच्या रुग्णांसाठी व्हिटॅमिन-सी आवश्यक आहे. त्याच वेळी, फणसाची गणना व्हिटॅमिन सी असलेल्या पदार्थांमध्ये केली जाते.

डायबिटीज इ जीवनसत्त्वने समृध्द फणस साखरेच्या रुग्णांसाठी इंसुलिन सुधारू शकतात. या व्यतिरिक्त, याचा अँटीडायबेटिक प्रभाव देखील आहे. जो मधुमेह नियंत्रित करण्यास मदत करतो. फणसाची पाने गरम पाण्यात उकळून प्यायल्याने रक्तातील साखर नियंत्रित राहते. मधुमेहाच्या आहारात फणसाचा समावेश करणे फायदेशीर ठरते.


रक्तदाब नियंत्रित करते रक्तदाब नियंत्रित ठेवण्यासाठीही फणस फायदेशीर आहे. यामध्ये पोटॅशियमचे प्रमाण चांगले असल्याने रक्तदाब कमी होऊ शकतो. उच्च रक्तदाबाचे कारण असलेल्या सोडियमचा प्रभाव कमी करण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे. फणसात पोटॅशियमचे प्रमाण जास्त आणि सोडियमचे प्रमाण कमी असते, त्यामुळे ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांनी फणसाचा आहारात समावेश करावा.

वजन कमी करते लठ्ठपणाची समस्या कमी करण्यासाठी जॅकफ्रूटचा आहारात समावेश केला जाऊ शकतो. यामध्ये भरपूर फायबर असते जे वजन कमी करण्यास मदत करते. यामध्ये कॅलरीज कमी असतात, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, पोटॅशियम, आयर्न, मॅग्नेशियम देखील वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.

# आधुनिक खगोलशास्त्राचा उद्गाता काळाच्या पडद्याआड जयंत नारळीकरांचं पुण्यात निधन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२०मुंबई-** जेष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचं पुण्यातील राहत्या घरी निधन झालं आहे. ते ८६ वर्षांचे होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्यांचा खगोल शास्त्रातील अधिकार मान्य झाला होता असे जयंत नारळीकर तेवढ्याच रसाळ भाषेत मराठी विज्ञानकथा लिहण्यासाठी देखील लोकप्रिय होते. केंब्रीज विद्यापीठातून शिक्षण घेतल्यावर ते भारतात परतले. आधी टाटा मुलभूत संशोधन संस्थेत त्यांनी काम केले. त्यानंतर आयुका संस्थेच्या उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. २०२१मध्ये नाशिकमध्ये झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. पहाटे झोपेतच त्यांची प्राणज्योत मालवली.



जयंत नारळीकर यांचा जन्म कोल्हापूरमध्ये झाला होता. त्यांचे वडील बनारस हिंदू विद्यापीठात शास्त्रज्ञ होते. जयंत नारळीकर यांचे शिक्षण बनारस हिंदू विद्यापीठात झाले. पुढील शिक्षणासाठी ते केंब्रिजला केले. त्याकाळी जयंत नारळीकर यांनी फ्रेड हॉईल यांच्यासोबत काम केले होते. फ्रेड हॉईल हे जयंत नारळीकर यांचे गुरु होते. जगभरातील आघाडीच्या खगोलशास्त्रज्ञांमध्ये फ्रेड हॉईल यांचा समावेश व्हायचा. त्याकाळात हॉईन-नारळीकर ही थिअरी त्याकाळी प्रसिद्ध झाली होती. जगाची निर्मिती स्फोटातून झाली, या थिअरीचे दोघेही टीकाकार होते. जयंत नारळीकर यांना १९७२ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बोलावून घेतले. त्यानंतर जयंत नारळीकर यांनी टीआयएफआरमध्ये दाखल झाले. भारताचं आजचं खगोलशास्त्राचं जे संशोधन आणि प्रगती आहे त्यामध्ये जयंत नारळीकर यांनी पाया रचला होता. ते आधुनिक खगोलशास्त्राचे उद्गाते होते. त्यांच्या जाण्याने हे पर्व संपले आहे, अशी प्रतिक्रिया खगोलशास्त्राचे अभ्यासक मयुरेश प्रभुणे यांनी व्यक्त केली.

# पोलच्या स्टे ला हॉलीबॉल खेळतांना स्पर्श झाल्याने शॉक लागून युवकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० नांदगाव खंडेश्वर-**

फुबगाव येथील इलेक्ट्रिक पोलच्या स्टे ला हॉलीबॉल खेळतांना स्पर्श झाल्याने चेतन कानोडे (वय २१ वर्ष) या युवकाचा मृत्यू झाला. रविवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास ही घटना घडली.फुबगाव येथील वाई रस्त्यावर काही युवक दररोज रात्रीचे हॉलीबॉल खेळतात. नेहमीप्रमाणे रविवारी खेळणे सुरू होते. रात्री ११ वाजतादरम्यान खेळतांना बॉल इलेक्ट्रीक पोल जवळ गेला. बॉल आणाण्यासाठी चेतन कानोडे हा तिथे गेला असता, त्याचा स्पर्श पोलच्या स्टेला झाल्याने तो कांट लागून कोसळला. नातेवाईकांनी त्याला ग्रामीण रुणालयात उपचाराकरिता आणले. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. कानोडे परिवारात आई वडिलांना चेतन हा एकुलता एक असल्याने कुटुंबाचा आधार हरवला. चेतन हा फुबगावमध्ये पाणीपुरीचा व्यवसाय करायचा. त्याच्या अंतयात्रेला हजारोची उपस्थिती होती गावात सगळीकडे शोकमग्न वातावरण होते.मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : युवकाच्या मृत्यूला महावितरणचे कर्मचारी जबाबदार असून संबंधित कर्मचाऱ्यांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करावे व मृताच्या परिवाराला आर्थिक मदत देण्यात यावी, अन्यथा मृताच्या कुटुंबियासह आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी महावितरण कंपनीला पत्रातून दिला.

# केदारनाथ येथे अडकलेल्या भाविकांची हेलिकॉप्टरने सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०बुलढाणा :**

प्रतिकूल हवामान आणि अतिवृष्टीमुळे केदारनाथ येथे अडकून पडलेल्या पाच महाराष्ट्रीयन नागरिकांची सुटका करण्यात आली आहे. यामध्ये नागपूर, नाशिक आणि पुणे येथील एकूण ५ भाविकांचा समावेश आहे. त्यांना हेलिकॉप्टरच्या मदतीने गुप्त काशी येथे सुरक्षित पोहोचवण्यात आले आहे. यामुळे या पाच भाविकांसह त्यांच्या कुटुंबीयांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

केंद्रीय आरोग्य, आयुष आणि परिवार कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकारने त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांनी ही कौतुकास्पद कामगिरी बजावली आहे.

सुरक्षित ठिकाणी पोहोचल्यानंतर भाविकांनी केंद्रीय मंत्री व त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले आहे.



राज्यातील नाशिक येथील धीरेंद्र वाघ, डॉ. पूनम रेंडीवार, पुणे येथील ज्योती घोगे नागपूर येथील राधिका अवस्थी व त्यांचे अन्य सहकारी केदारनाथ येथे दर्शनासाठी गेले होते. मात्र, १८ मे रोजी केदारनाथ येथे प्रतिकूल हवामान निर्माण झाले. अतिवृष्टी झाल्यामुळे सर्वच मार्ग, रस्ते बंद झाले. दरम्यान, या भाविकातील दोन महिला भाविकांची प्रकृती खराब झाली.

काही जणांनी शिवसेना शिंदे गटाचे बुलढाणा जिल्हा युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, प्राध्यापक डॉ. सचिन जाधव यांच्याशी संपर्क साधून संकटाची माहिती दिली. तसेच मदतीसाठी साकडे घातले.

अतिवृष्टीचे थैमान थांबल्यानंतर केदारनाथ येथे अडकून पडलेल्या या भाविकांना हेलिकॉप्टरच्या मदतीने खाली मुक्त काशी येथे सुरक्षितरित्या आणण्यात आले. या भाविकांच्या संपर्कात केंद्रीयमंत्र्यांचे दिल्ली येथील स्वीय सहाय्यक अचल भाटिया हे सातत्याने होते.

संकटकाळात मिळालेल्या मदतीबद्दल या भाविकांनी केंद्रीयमंत्री व त्यांची चमू, उत्तरांचल सरकार, मुख्यमंत्री आणि आपत्ती विभागाचे आभार मानले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-MHMR 2023/84526- प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २० मे २०२५

शहर/ग्रामिण




# अवकाळी पावसाचा शेती पिकांना मोठा फटका

## अमरावतीत १३ हजार हेक्टरवरील पीके मातीत...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–**
राज्यभरात अवकाळी पावसाने २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची माहिती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. अमरावती जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक १३ हजार हेक्टर क्षेत्रबाधितझालं आहे. तर नाशिकमध्ये ५ हजार ८०० हेक्टर क्षेत्र बाधित आहे. राज्यात फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे.

अमरावती जिल्ह्यात जिल्ह्यात वादळी वारा व गारपिटीसह अवकाळी पावसाचा धारणी, चिखलदरा, भातकुली, चांदूरबाजार, अचलपूर, वरुड, मोर्शी, नांदगाव खंडेश्वर व धामणगावरेल्वे आदी तालुक्यांना अधिक फटका बसला आहे.गेल्या आठवड्यात धामणगाव रेल्वेत दोघांचा वीज पडून मृत्यू झाला होता. तसेच पाच जनावरे दगावली. धारणी तालुक्यात वादळी पावसामुळे गोठ्यासह ५० च्या वर घरांची पडझड झाली होती.

तसेच जिल्ह्यात ९ जनावरे दगावली आहेत.अवकाळी पावसाचा फटका उन्हाळी पिकांना बसला असून धारणी, चिखलदरा, भातकुली, चांदूरबाजार, अचलपूर आणि मोर्शी या तालुक्यांत उन्हाळी मूग, कांदा, आंबा, संत्रा, केळी व ज्वारी या पिकांचे नुकसान झाले आहे.

जिल्ह्यातील ५६गावांतील १३ हजार हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले असल्याचा जिल्हा प्रशासनाचा प्राथमिक अहवाल आहे.

यामध्ये अचलपूर तालुक्यात सर्वाधिक पाचहजार ३२१, तर चांदूरबाजार तालुक्यातील चार हजार ८२१ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे.

### खरीप हंगामात अधिकाऱ्यांना रजेवर जाण्यास बंदी

कृषी सहायकांनी संप पुकारत खरीप हंगामात शेतकरी आणि सरकारला वेठीस धरण्याचे काम सुरु केले आहे. कृषी सहायकांच्या सर्व मागण्या मान्य केल्या असतांनाही ते संपावर गेल्याने संबंधितांवर कारवाई केली जाईल. तसेच खरीप हंगामात कृषी विभागातील कोणतेही अधिकारी ,कर्मचारी रजेवर जाणार नाहीत. खरीपाची लागवड होईपर्यंत त्यांची रजा बंद असेल, असेही कोकाटे यांनी सूचित केले.

# जगदीश गुप्ता शिवसेना शिंदे गटात सामील होणार

## माझ्या समर्थकांसोबत बोलल्यानंतर निर्णय घेतल्याचे सांगितले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**
महापालिका निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी माजी पालकमंत्री आणि बंडखोर भाजप नेते जगदीश गुप्ता यांनी शिवसेना (शिदे गटात) सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात त्यांनी सोमवारी हॉटेल ग्रेस इन येथे त्यांच्या कट्टर समर्थकांसह बैठक घेतली आणि त्यानंतर त्यांनी शिवसेना (शिदे) मध्ये सामील होण्याची घोषणा केली. वृत्त केसरी, प्रतिदिन अखबार सोबत बोलताना, जगदीश गुप्ता यांनी स्वतः कबूल केले की ते आता शिवसेना (शिदे) मध्ये सामील होत आहेत. त्यांना कोणती जबाबदारीदेण्यात आत्मी आहे असे विचारले असता, त्यांनी सांगितले की, या सर्व गोष्टी औपचारिकपणे शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर ठरवल्या जातील. त्यांनी सांगितले की, शिवसेनेत सामील होण्यापूर्वी (शिदे) त्यांनी त्यांच्या समर्थकांशी चर्चा केली आणि त्यांच्या अनुमतीनंतरच हा निर्णय घेतला. त्यांनी हॉटेल ग्रेस इन येथे त्यांच्या कट्टर समर्थकांची बैठक घेतली आणि त्यांचे मत जाणून घेतले. त्यांच्या



समर्थकांनी सहमती दर्शविल्यानंतर त्यांनी शिवसेना (शिदे) मध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. लवकरच ते एका भव्य कार्यक्रमात शिवसेना शिंदे गटात सामिल होतील. यावेळी जगदीश गुप्ता यांनी त्यांच्या समर्थकांसमोर सागितले की, मी हिदुत्वाची लढण्यासाठी लढाई भाजपमध्ये सामील झालो होतो पण भाजपने हिदुत्वाचा त्याग केला आहे. भाजपमध्ये आता जुन्या आणि

### महापालिका निवडणुकी पूर्वीच घेतला निर्णय

कष्टाळू भाजप कार्यकर्त्यांचा आदर केला जात नाही. म्हणूनच मी हिदुत्वाच्या पुढील लढाईसाठी शिवसेना (शिदे) गटात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. यादरम्यान, जगदीश गुप्ता यांनी त्यांच्या सर्व कट्टर समर्थकांना यावर त्यांचे मत व्यक्त करण्यास सांगितले. या काळात त्यांच्या सर्व समर्थकांनी त्यांना शिवसेनेत (शिदे) सामील होण्यास अनुमती दर्शविली. या कार्यकर्ता मेळाव्यात माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांचे ४०० हून अधिककट्टर समर्थक उपस्थित होते.उल्लेखनीय असे की, प्रिती बंड शिवसेनेत सामील झाल्या तेव्हा जगदीश गुप्ता देखील शिवसेनेत जाणार अशी चर्चा होती. पण त्यावेळी पण त्यावेळी काही कारणांमुळे त्यांचा प्रवेश पुढे ढकलण्यात आला. पण आता त्यांनी स्वतः शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची पुष्टी केली आहे.

### हिंदुत्वाचा लढा पुढे सुरु ठेवणार

मी सुरुवातीपासूनच हिदुत्वासाठी लढलो आहे. म्हणूनच मी भाजपमध्ये सामील झालो. पण भाजप आता हिदुत्वाच्या मुद्द्यावर तितकासा बोलका राहिलेला नाही. अशा परिस्थितीत मी भाजपविरुद्ध बंड केले. आता मी हिदुत्वाचा लढा पुढे नेण्यासाठी शिवसेनेत (शिदे) सामील होत आहे. शिवसेनेत प्रवेश केल्यानंतरच कोणते पद किवा जबाबदारी द्यायची हे चर्चेनंतर ठरवले जाईल.

# दगडाने ठेचून युवकाची हत्या

## युवक म्हणाले, आम्ही खून केला पण कुणाचा माहित नाही!पोलीस ही चक्रावले..



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** – दगडाने ठेचून युवकाची हत्या केल्यानंतर युवकांनी दिवसभर मद्यपान केले आणि सायंकाळी तिघांनी राजापेठ पोलीस ठाण्यात जाऊन हत्या केल्याची कबुली दिली. परंतु मृताचे नाव माहित नसल्याचे सांगितले. हा प्रकार ऐकून पोलिसांच्या पायाखालची वाळू सरकली. पोलिसांनी युवकांना घेऊन घटनास्थळ गाठले. घटनास्थळ खोलापुरीगेट ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने राजापेठ पोलिसांनी सुटकेचा श्वास घेतला. खोलापुरीगेट पोलिसांनी तीन्ही युवकांना अटक व मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरु केले. सागर अडायके, विक्की सरकटे आणि निलेश सावरकर अशी अटकेतील युवकांची तर साहिल राऊत आणि नवनीत इंगोले अशी पसार युवकांची नावे आहेत.राजापेठ पोलीस ठाण्यात सायंकाळ च्या सुमारास तीन युवक दारूच्या नशेतआले आणि आम्ही पाच मित्रांनी एका युक्काची दगडाने ठेचून हत्या केल्याचे त्यांनी पोलिसांना सांगितले. हे ऐकताच कर्मचाऱ्याने तिघांना ठाणेदारासमोर उभे केले असता त्यांनी तेच सांगितले. मंगळवारी शहरात नवीन पोलीस आयुक्त येत आहेत आणि आपल्या हद्दीत हत्या झाली तसेच कोणाची हत्या केली हे सुध्दा मारेकऱ्यांना माहित नाही. त्यामुळे पोलिसांच्या पायाखालची वाळूच सरकली.त्यांनी लगेच त्या युवकांना सोबत घेतले आणि घटनास्थळावर नेले. घटनास्थळ भातकुली मार्गावरील राऊत यांचे शेत होते. संबंधित घटनास्थळ खोलापुरीगेट ठाण्याचे असल्याने त्याची माहिती खोलापुरीगेट पोलिसांना देऊन राजापेठ पोलिसांनी सुटकेचा श्वास घेतलाखोलापुरीगेट पोलीस घटनास्थळाची पाहणी केली. राऊत यांच्या शेतातील टिनाच्या शेडमध्ये २० ते २२ वर्षीय युवक मृत अवस्थेत दिसला. पोलिसांनी तपास चक्र फिरविले. तिन्ही मारेकऱ्यांना ताब्यात घेऊन त्यांची कसुन चौकशी केली असता मृतक कोण आहे हे माहित नाही मात्र दारुच्या नशेत पाच मित्रांनी मिळून त्याची हत्या केल्याचे सांगितले. खोलापुरीगेट पोलीस मृतकाची ओळख पटवीण्याचा प्रयत्न करीत आहेत. तपासादरम्यान मृत हा राजापेठ ठाण्याच्या हद्दितील झेंडा चौकातील रहिवाशी असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली असून पोलीस पुढील तपास करीत आहे.

# आचारसंहितेपूर्वी अत्यावश्यक कामे निपटवा

## महापालिका आयुक्तांच्या विभाग प्रमुखांना बैठकीत सूचना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–**
अमरावती सर्वोच्च न्यायालयाने पुढील ४ महिन्यांत स्थानिक स्वायत्त संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश दिलेले आहेत. परंतु महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग रचना काय असेल आणि जिल्हा परिषदेत किती जागांसाठी निवडणुका होईल हे अद्याप अनिश्चित आहे. महापालिकेच्या प्रभाग रचनेबाबत आणि जिल्हा परिषदेच्या सदस्यसंख्येबाबत गोंधळाचे वातावरण आहे. तर दुसरीकडे महापालिकेत सोमवारी झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत महापालिका आयुक्तांनी विभागप्रमुखांना अति महत्त्वाच्या कामांना तातडीने मार्गी लावण्याची सूचना केली आहे.

महापालिकेत सोमवारी विभाग प्रमुखांची बैठक घेण्यात आली. यापूर्वी, जनगणना २०११ मध्ये करण्यात आली आणि २०२१ मध्ये प्रस्तावित केलेली जनगणना कोविड महामारी आणि लॉकडाऊनमुळे होऊ शकली नाही. अशा परिस्थितीत, स्थानिक स्वायत्त संस्थांच्या निवडणुकांसाठी आता २०११ सालची लोकसंख्या आधार मानली जात आहे. त्याचवेळी, गेल्या १५ वर्षांतील लोकसंख्येतील – अंदाजे वाढीचा डेटा देखील संकलित केला जात आहे. त्याचे अमरावती महानगरपालिकेत तीन किंवा चार सदस्यीय वॉर्ड असू शकतात. अमरावती – महानगरपालिकेतील सदस्यांची संख्या ८७ आहे. २०१७ च्या – निवडणुकीनुसार ते तीन सदस्यीय विभागीय रचनेत विभागले जाईल की चार सदस्यीय विभागीय रचनेचा निर्णय घेतला जाईल, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. अमरावती महानगरपालिकेत चार सदस्यांचा प्रभाग निर्माण झाला तर एकूण २२ प्रभाग होतील, ज्यामध्ये सर्वात कमी लोकसंख्या असलेल्या प्रभागात तीन सदस्य असतील, तर तीन सदस्यीय प्रभाग रचना लागू केल्यानंतर अमरावती महानगरपालिका क्षेत्रात २९ प्रभाग अस्तित्वात येतील. याशिवाय, जर २०१७ नुसार निवडणुका झाल्या तर २३ जागा ओबीसी प्रवर्गासाठी राखीव राहतील. उल्लेखनीय असे की की यापूर्वी राज्यातील महाविकास आघाडी सरकारने तीन सदस्यीय प्रणाली लागू केली होती त्यानुसार, महानगरपालिका निवडणुका घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार प्रभाग रचनाही तयार करण्यात आली. परंतु निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. यानंतर अस्तित्वात आलेल्या महायुती सरकारने मागील सरकारचा निर्णय रद्द करत चार सदस्यीय प्रभाग पद्धतीनुसार नगरपालिका निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला. ज्याची तयारीही सुरू झाली आहे. परंतु या काळात ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आणि तेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांचा मुद्दा रखडला होता.२०११ च्या अमरावती महानगरपालिकेत तीन किंवा चार सदस्यीय वॉर्ड असू शकतात. अमरावती महानगरपालिकेत चार सदस्यांचा प्रभाग निर्माण झाला तर एकूण २२ प्रभाग होतील, ज्यामध्ये सर्वात कमी लोकसंख्या असलेल्या प्रभागात तीन सदस्य असतील, तर तीन सदस्यीय प्रभाग रचना लागू केल्यानंतर अमरावती महानगरपालिका क्षेत्रात २९ प्रभाग अस्तित्वात येतील. याशिवाय, जर २०१७ नुसार निवडणुका झाल्या तर २३ जागा ओबीसी प्रवर्गासाठी राखीव राहतील.आता पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार निवडणुकीची आचारसंहिता केव्हाही लागू शकते. त्यामुळे कामाला लागा. अत्याश्यक महत्त्वाच्या सर्व प्रक्रिया पूर्ण करा, अशा सूचना मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सर्व विभाग प्रमुखांना दिल्या.

# मोर्शी तालुक्यातील विमान भूपृष्ठावरील जलस्त्रोतांचे पर्यवेक्षण करणारे

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये : जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मोर्शी–** मोर्शी तालुक्यातील काही भागात आज एक विमान भूपृष्ठाजवळ घिरट्या घालताना दिसून आले आहे. हे विमान विमान भूपृष्ठावरील जलस्त्रोतांचे पर्यवेक्षण करणारे असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.आज सकाळी साडेसात ते आठ वाजता मोर्शी तालुक्यातील रिद्धपूर मंडळात खेड, तळेगाव, धामणगाव आणि आष्टगाव या परिसरात आकाशातून एक विमान भूपृष्ठाजवळ घिरट्या घालताना नागरिकांना स्पष्टपणे दिसले. हे विमान जवळपास अर्धा तास या भागात घिरट्या घालत होते. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने सदर विमान भूपृष्ठावरील जलस्त्रोतांचे पर्यवेक्षण करण्यासाठी यंत्रणेकडून वापरण्यात



आले आहे. या विमानाद्वारे भागातील पाण्याच्या साठ्याची माहिती घेतली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये आणि कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.नागरिकांनी आवश्यकता भासल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे दूरध्वनी क्रमांक ०७२१-२६६२०२५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यकर्ती गुंजन गोळे हिला धमकी देणाऱ्या आरोपीला तत्काळ अटक करा

## तुषार भारतीय यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती–**
अमरावती येथील तपोवन परिसरात अनाथ मुलांचा सांभाळ करणाऱ्या गोकुळ आश्रम च्या संचालिका गुंजन गोळे यांना एका इम्रान नावाच्या इसमाकडून फोन वरून धमकी दिली होती .

एवढेच नव्हे तर देशाचे पंतप्रधान यांना देखील अतिशय गलिच्छ शब्दांचा वापर केला व गुंजन व पंतप्रधान यांना अश्लील शब्दात शिवीगाळ केली. या संदर्भातील गुन्हे दाखल करण्यात आले परंतु अजून पर्यंत आरोपाला अटक करण्यात आली नाही .अमरावती महानगरपालिका स्थायी समिती माजी सभापती तुषार भारतीय यांनी प्रभारी पोलीस आयुक्त गणेश शिंदे यांची भेट घेऊन गुंजन गोळे यांना धमकी देणाऱ्या आरोपीला तत्काळ अटक करायची मागणी केली . यासंदर्भात पोलीस विभागाने आजपर्यंत केलेली कार्यवाही बाबत माहिती दिली तसेच आरोपीला लवकरात लवकर अटक करण्याचे आश्वासन दिले.यावेळी माजी महापौर चेतन गावंडे , भाजप पदाधिकारी प्रशांत शेंगोकर , राजेश जगताप , हेमंत मालवीय , कवल पांडे , संगम गुप्ता , संतोष पिंडेकर प्रामुख्याने उपस्थित होते.




# 'मधाचे गाव' आमझरी येथे आज जागतिक मधमाशा दिन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–** जिल्ह्यातील मधाचे गाव असलेल्या आमझरी येथील निसर्ग पर्यटन संकुलात मंगळवार, दि. २० मे रोजी सकाळी ११ वाजता जागतिक मधमाशा दिन साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे मधपाळाचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

नैसगिक संसाधनांचे संवर्धन व ग्रामीण भागातील युवक आणि महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे मधाचे गाव संकल्पना राबविण्यात येत आहे. त्यानुसार चिखलदरा तालुक्यातील आमझरी या गावाची 'मधाचे गांव' म्हणून निवड करण्यात आली आहे.

आमझरी गाव चिखलदरा पर्यटनस्थळाच्या नजिक आहे. आमझरी वन




नर्सरी पर्यटनस्थळ आहे. या गावामधे स्थानिक आदिवासी आग्या मधमाशाचे मध काढण्याचा व्यवसाय पारंपारीक पद्धतीने करतात. त्यामुळे या गावात खादी आणि ग्रामोद्योग मंडळाने स्थानिक लाभार्थींना आग्या मधमाशाचे शास्त्रीय पद्धतीने मध काढण्याचे प्रशिक्षण देऊन मध काढण्यासाठी लागणारे साहित्य वाटप करण्यात आले आहे. आमझरी येथे मधाचे गाव संकल्पनेनुसार निसर्गातील मधमाशाचे संरक्षण व संवर्धनासोबतच मध व इतर उत्पादनापासून स्थानिक आदिवासीना रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच चिखलदरा येथे भेट देणाऱ्या पर्यटकांना मधमाशाचे निसर्गतील व मानवी जीवनातील महत्व याबाबत माहिती होण्यासाठी विविध उपक्रम प्रस्तावित करण्यात आले आहेत.

या कार्यक्रमात मधमाशी पालन तज्ज्ञाचे मार्गदर्शन मधपाळाना लाभणार आहे. जिल्ह्यातील मधपाळ आणि शेतकऱ्यांनी मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी केले आहे.

# आरोपीच्या अटकेसाठी गाडगेनगर ठाण्यात ठिय्या

## गोकुळ आश्रमच्या संचालिकेला धमकी दिल्याचे प्रकरण



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती –** गोकुळ आश्रमच्या संचालिकेला एका युक्काने फोन करून शिवीगाळ करीत घमकी दिली होती. याप्रकरणातील आरोपीला अद्यापही गाडगेनगर पोलिसांनी अटक केली नाही. त्यामुळे सोमवारी आश्रमच्या संचालिकेने गाडगेनगर ठाण्यात जाऊन ठिय्या आंदोलन करीत आरोपीला तत्काळ अटक करण्याची मागणी केली. त्यामुळे काही वेळाकरिता पोलीस ठाण्यात चांगलीच खळबळ उडाली होती.

गुंजन तळेगावकर उर्फ गुंजन गोळे या गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोकुळ आश्रम चालवितात. मागील एक महिन्याआधी एका महिलेने तिच्या १५ वर्षाचा मुलाला आश्रमात ठेवले होते. त्यानंतर १४ मे रोजी महिलेने तळेगावकर यांना फोन करून मुलाची चौकशी केली. परंतु तळेगावकर यांनी मुलाला घेऊन जाण्यास सांगितले. तेव्हा महिलेच्या मोबाईलवरून इमरान नावाचा युवक बोलला आणि शिवीगाळ करीत त्याने धमकी दिली होती. त्यामुळे तळेगावकर यांनी गाडगेनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तसेच पोलिसांनी गुन्हासुध्दा दाखल केला आहे.परंतु अद्यापही पोलिसांनी आरोपीला अटक केली नाही. त्यामुळे तळेगावकर दुपारी पोलीस ठाण्यात आल्या आणि आरोपीला अद्यापही अटक केली नाही म्हणून चांगलाच गोंधळ घातला. त्यावेळी काही हिंदू संघटनेचे पदाधिकारीसुध्दा त्यांच्या सोबत होते. पोलिसांनी त्यांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तळेगावकर यांनी ठाण्यातच ठिय्या मांडला.

# वरूड ग्रामीण रुग्णालय गर्भवतींसाठी वरदान

## नॉर्मल डिलिव्हरी करण्यावर दिला जातो भर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०वरुड** –ग्रामीण रुग्णालय वरूड हे तालुक्यासह परिसरातील गर्भवती महिलांसाठी सुविधाजनक तसेच वरदान ठरत आहे. या ग्रामीण रुग्णालयात प्रसूतीसाठी असलेल्या सुविधांमुळे गर्भवती महिलांना खर्च करून जिल्हा स्त्री रुग्णालय डफरीन येथे यावे लागत नाही. येथे नॉर्मल डिलिव्हरी करण्यावर भर दिला जातो, हेच येथील मुख्य वैशिष्ट्य आहे. येथे मागील एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या आर्थिक वर्षात २ हजार १४२ प्रसूती झाल्या. त्यापैकी ५० टक्क्यांच्या वर प्रसूती या नॉर्मल झाल्या आहेत. वरूड ग्रामीण रुग्णालयात केवळ तालुक्यातीलच नव्हे तर तालुक्याच्या बाहेरील गर्भवती महिलाही या सुविधेचा लाभ घेत आहेत. ग्रामीण रुग्णालयात मोफत प्रसूती होत असल्यामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांचा साहजिकच येथे बाळंतपण करून घेण्याकडे ओढा वाढला आहे. खासगी

### २ हजार १४२ डिलिव्हरी




रुग्णालयांमध्ये डिलिव्हरी करून घ्यायची म्हटले की किमान ५० ते ७५ हजारापर्यंत खर्च येतो. ही बाब सर्वसाधारण आर्थिक स्थिती असलेल्या लोकांच्या अवाक्याबाहेर असल्याने ग्रामीण रुग्णालय हे बाळंतपणासाठी उत्तम पर्याय म्हणून नावारूपास आले आहे.ग्रामीण रुग्णालय वरूड येथे प्रथम नॉर्मल डिलिव्हरी करण्यावरच डॉक्टरांचा भर असतो. परंतु, जर गर्भवती महिलेसह बाळाला जर इजा होण्याची शक्यता असेल तरच मग सिझेरियनद्वारे डिलिव्हरी केली जाते. त्यामुळे तालुक्यासह तालुक्या बाहेरील गर्भवती महिला ग्रामीण रुग्णालय वरूड येथे प्रसूती करून घेण्यासाठी प्राधान्य देत असल्याचे दिसून येत आहे. वर्षभरात २ हजार १४२ केल्या डिलिव्हरी वैद्यकीय अधीक्षक डॉ.परीक्षित रामपुरे, डॉ. प्रमोद पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. रोशन सिंहमारे, डॉ. प्रवीण ठाकरे, डॉ. धीरज टेकोडे, डॉ. खुशाली राठोड, डॉ. भक्ती मेहरे या डॉक्टर मंडळीनी एका वर्षात एकूण २ हजार १४२ डिलिव्हरी केल्या असून त्यापैकी १ हजार १२७ डिलिव्हरी नॉर्मल तर १ हजार ०१५ डिलिव्हरी या सिझेरियन द्वारे करण्यात आल्याची माहिती आरोग्य प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्किट विशेष यात्रेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती,–** छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने, भारतीय रेल्वे खानपान आणि पर्यटन महामंडळ आणि महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे 'भारत गौरव' पर्यटक ट्रेन सुरू करण्यात येत आहे. या ट्रेनद्वारे 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट' या पाच दिवसांच्या विशेष यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही यात्रा ९ जून २०२५ रोजी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सुरू होणार आहे. या यात्रेत रायगड किल्ला, पुणे येथील लाल महाल आणि शिवनेरी किल्ला, भिमाशंकर ज्योतिर्लिंग, प्रतापगड किल्ला आणि कोल्हापूर येथील पन्हाळा किल्ला आणि महालक्ष्मी मंदिर यांसारख्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या स्थळांना भेटी देण्यात येणार आहेत.



यात्रेकरूंना नाश्ता, जेवण, निवास, रेल्वे प्रवास आणि स्थळभेट दरम्यानचा प्रवास खर्च पॅकेजमध्ये समाविष्ट असेल. ही पाच दिवसांची यात्रा ९ जून ते १३ जून २०२५ दरम्यान असून, १४ जून २०२५ रोजी ट्रेन मुंबईला परत येईल. यात्रेसाठी इच्छुक असलेले प्रवासी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर आणि ठाणे या स्थानकांवरून ट्रेनमध्ये चढू शकतील. या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक यात्रेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी यांनी केले आहे.

# मूर्तिजापूर रेल्वेस्थानकाला आधुनिकतेचा स्पर्श

## अमृत भारत स्टेशन योजनेत प्रवासी सुविधांसह सौंदर्यीकरण, सुरक्षिततेवर भर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मूर्तिजापूर–** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील मूर्तिजापूर स्थानकाचा अमृत भारत स्टेशन योजना अंतर्गत सर्वांगीण विकास पूर्ण झाला आहे. या अंतर्गत करण्यात आलेल्या सुधारणा प्रवाशांच्या सोयीसाठी, सौंदर्यीकरण व सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. स्थानकाच्या पुनर्विकासाची पायाभरणी सन २०२३ मध्ये केली होती. या सर्व अद्ययावत सुविधांमुळे मूर्तिजापूर स्थानक अधिक आकर्षक, सुरक्षित व प्रवासी केंद्रित झाले आहे. स्थानिक प्रवाशांसाठी एक नवीन प्रवास अनुभव घेऊन येत आहे. अमृत भारतच्या यशस्वी अंमलबजावणीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरते.प्रवाशांच्या सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या प्रमुख सुधारणांमध्ये प्रवासी प्रवेश व संवाद सुविधा, नवीन आरक्षण व तिकीट बुकिंग कार्यालयाची इमारत उभारण्यात आली आहे. प्रवाशांच्या सुलभ हालचालीसाठी दोन स्वतंत्र प्रवेश व निर्गमन द्वार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्लॅटफॉर्मवर सुलभ प्रवेशासाठी तीन लिफ्ट बसवण्यात आल्या आहेत. १,६०० चौरस मीटर क्षेत्रफळामध्ये सर्क्युलेटिंग एरिया




व वाहनतळ विकसित करण्यात आले आहे.२५० मीटर लांबीची कंपाऊंड वॉल : स्थानकाच्या सुरक्षेसाठी २५० मीटर लांबीची कंपाऊंड वॉल उभारण्यात आली आहे. अद्ययावत सुविधांमुळे मूर्तिजापूर स्थानक अधिक आकर्षक, सुरक्षित व प्रवासी केंद्रित झाले आहे. स्थानिक प्रवाशांसाठी एक नवीन प्रवास अनुभव घेऊन येत आहे. अमृत भारत योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याच्या प्रतिक्रिया प्रवासी व्यक्त करत आहे.प्लॅटफॉर्मवरील सुविधा प्लॅटफॉर्म क्र. १ वर ५ पिण्याच्या पाण्याचे स्टँड बसवण्यात आले आहेत. प्लॅटफॉर्म क्र. १ व २ वर प्रत्येकी एक नवीन स्वच्छतागृह उभारण्यात आले आहे. प्लॅटफॉर्म १ – १,९०० चौ.मी., प्लॅटफॉर्म २ – २,१०० चौ.मी. प्लॅटफॉर्म पृष्ठभाग सुधारणा: प्लॅटफॉर्म १ – ४,००० चौ.मी., प्लॅटफॉर्म २ – ५,५०० चौ.मी. इमारती व कार्यालयांचे नूतनीकरण: प्लॅटफॉर्म क्र. १ वरील १० कार्यालयांचे नूतनीकरण करण्यात आले असून त्यात ३ व्हीआयपी कक्ष, स्टेशन मास्टर, ओएस कार्यालय, पुरुष व महिला प्रतीक्षालय, दूरसंचार यांचा समावेश आहे.

# चांदूर रेल्वे शहरातील अंतर्गत नवीन रस्ते बनले चिखलमय

## नवीन काँक्रीट रस्ते पाइपलाइनसाठी खोदले; दुरुस्ती नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे शहरात पाण्याची नवीन पाइपलाइन टाकण्याचे काम ६ ते ७ महिन्यांपासून सुरू झाले. नवीन पाइपलाइन टाकल्यानंतर त्यावर काँक्रिटीकरण किंवा डांबरीकरण करण्यात आले नसल्याने तेथील माती आता संपूर्ण रस्त्यावर येऊन काँक्रीटचे रस्ते आता चिखलमय होत असल्याचे दृश्य दिसत आहे. यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याकडे मात्र नगर परिषदेचे संबंधित अधिकारी–कर्मचारी यांचे दुर्लक्ष होत असल्याची ओरड नागरिकांनी केली आहे.



चांदूर रेल्वे शहरात नवीन पिण्याची पाइपलाइन टाकण्याचे काम सुरू आहे. यामुळे चांदूर वासीयांचा पाण्याचा प्रश्न मिटणार असून शुद्ध पिण्याचे पाणी मिळणार असल्याचे समजते. मात्र, सदर काम सुरू असताना ते व्यवस्थित होणेही तेवढेच महत्वाचे आहे. विविध भागात घरासमोरून पाइपलाइन टाकण्याकरिता खोदकाम करून पाइपलाइन टाकली जात आहे. त्यानंतर लगेच मातीने खड्डे बुजवले जात आहेत. मात्र बुजवतेवेळी व्यवस्थितपणे लेव्हलिंग होत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.काही नागरिकांनी तर नाइलाजाने स्वत:हून आपल्या घरासमोरील लेव्हलिंग केले. राम नगरसह अनेक भागात पाइपलाइन टाकून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटला. परंतु, खोदलेल्या ठिकाणी व्यवस्थितपणे लेव्हलिंग करून त्यावर काँक्रिटीकरण अथवा डांबरीकरण अद्याप करण्यात आलेले नाही. अनेक भागात तर पाइपलाइन टाकण्याकरिता काही महिन्यांपूर्वी केलेले नवीन काँक्रीट रस्ते देखील फोडले जात आहेत. सध्या अवकाळी पाऊस सुरू असून या पावसामुळे शहरातील अनेक भागातील पाइपलाइनच्या वर टाकण्यात आलेली माती रस्त्यावर येऊन चांगले रस्ते चिखलमय झाले आहे.

अनेक ठिकाणी जुन्या पाइपलाइन होतेय लिकेज या पाइपलाइनचे काम करतेवेळी अनेक ठिकाणी जुन्या पाइपलाइन लिकेज होत आहेत. मात्र यावर तत्काळ दुरुस्ती सुद्धा होत नसून मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. कंत्राटदाराच्या या गलथान कारभारावर नगर परिषद कडून कोणतीही कारवाई करण्यात येत नसल्याचे दिसत आहे. या समस्येबाबत नगर परिषद अधिकाऱ्यांकडून प्रतिक्रियेसाठी कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

# शासकीय हरभरा खरेदीकडे शेतकऱ्यांनी फिरवली पाठ,

## बाजारात अधिक भाव मिळत असल्याचा परिणाम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अकोला**

अकोला नाफेडतर्फे आधारभूत किंमत योजनेंतर्गत हमीदराने शासकीय हरभरा खरेदीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरल्याचे दिसून येत आहे. १ हजार २५७ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असली तरी अद्यापही विक्री केलेली नाही. हमी भाव ५ हजार ६५० असून, बाजारात मात्र ७ हजार ७०० पेक्षा जास्त मिळत आहेत. तसेच बाजारात विक्रीसाठी कोणताही त्रास होत नसून, शेतकऱ्यांना पैसेही तातडीने मिळतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी शासकीय खरेदीकडे पाठ फिरवल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. गत खरीप हंगामात सोयाबीन, तुरीचे दर बाजारात कमी मिळाले. त्यामुळे सातत्याने शासकीय खरेदीची मागणी शेतकऱ्यांकडून झाली. त्यामुळे ही खरेदी प्रक्रिया राबवण्यात आली. त्यानंतर हरभरा



खरेदीची मागणी झाली होती. मात्र, सोयाबीनची खरेदी प्रक्रिया कधी बारदाना नसल्याने तर कधी अन्य तांत्रिक कारणांमुळे संथ गतीने झाली. अनेकदा तर खरेदी प्रक्रिया बंदही करण्यात आली होती. परिणामी सोयाबीनची नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांकडून खरेदी झाली नाही. आता बाजारात हमीभावा पेक्षा जास्त भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांनी शासकीय खरेदीकडे पाठ फिरवली आहे. हे लागणार नोंदणीसाठी : हरभरा नोंदणी, खरेदीसाठी शेतकऱ्यांना काही कागदपत्रे सादर करावी लागणार आहे. यात आधारपत्र, सातबारा, ऑनलाईन पीकपेरा, आधार जोडणीच्या बँक खातेपुस्तिकेची छायाप्रत, भ्रमणध्वनी क्रमांक आदी कागदपत्रांसह संबंधित खरेदी केंद्रावर नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

# वातावरण बदलामुळे संसर्गजन्य आजारांचा वाढला धोका

## काळजी घेण्याचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी केले आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती–** गेल्या तीन चार दिवसांपासून दिवसा कडक उन आणि सायंकाळी चार नंतर अचानक पडणाऱ्या अवकाळी पावसाने अमरावती कर सुखावले असले. तरी वातावरणातील बदलामुळे अनेक आजारांनादेखील निमंत्रण मिळणार आहे. यासाठी जिल्हा आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. व्हायरल फिवर, सर्दी–खोकला, उलटी–जुलाब या संभाव्य आजारांची बाधा झालेल्या रुग्णांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय संलग्न उपजिल्हा रुग्णालयाचा बाह्य रुग्ण विभाग अधिक सतर्क ठेवण्यात येणार आहे. तसेच सामान्य वॉर्डसह लहान मुलांचे वॉर्ड तयार ठेवले आहेत, अशी माहिती रुग्णालयाच्या सूत्रांनी दिली. वातावरणात बदल झाल्यास आजारपण आणि थकवा वाढतो. सध्या वातावरणात झालेला अचानक बदल त्रासदायक ठरू शकतो. उन्हाळ्यात पाऊस पडल्यास सर्दी, खोकला यासारखे संसर्गजन्य आजार बळावतात. या बदलत्या वातावरणाचा त्रास लहान मुलांना जास्त होऊ शकतो. त्यांची विशेष काळजी



घ्यावी, ते पावसात भिजणार नाहीत, याची काळजी घ्यावी.

अवकाळी पावसाने अचानक बदललेल्या वातावरणाशी शरीराला जुळवून घेण्यास त्रास होऊ शकतो. अशीच स्थिती एक–दोन दिवस राहिल्यास साथजन्य आजाराचे रुग्ण वाढण्याची शक्यता शहरातील वैद्यकीय तज्ज्ञांनी वर्तवली आहे. गेल्या काही दिवसांपासून वातावरणात बदलामुळे आलेला गारवा आणि त्यानंतर पडलेल्या कडक उन्हामुळे तयार झालेल्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता अधिक सजक राहायला पाहिजे, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी केले आहे.

या संभाव्य आजारांचा धोका उलट्या, जुलाब, सर्दी, खोकला, व्हायरल फिवर, दम लागणे, श्वसनाचे आजार, घामोळ्या, त्वचा लाल होणे, डोळ्यांची जळजळ, व्हायरल फिवर यांसारख्या आजाराचे रुग्ण वाढणार असण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. अवकाळी पावसाने वातावरणातील बदल, धूळ आणि इतर घटकांमुळे दम लागणे अशा श्वासोच्छ्वासाच्या समस्या वाढू शकतात, असे जिल्हा सामान्य रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी सांगितले आहे.

# पारा घसरला, पण घामाने होतेय अंघोळ; उकाड्याने लाहीलाही

## सकाळी १० वाजेनंतर घराबाहेर पडणे झाले कठीण: पाऊस व उन्हामुळे वातावरण बनले दमट

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

दोन दिवसांपूर्वी जिल्ह्याच्या बहुतांश भागात अवकाळी पाऊस झाला. त्यानंतर तापमानात वाढ झाली आहे. त्यामुळे दमट वातावरण निर्माण होऊन असह्य उकाडा जाणवत आहे. त्यामुळे सकाळी १० वाजल्यानंतर घराबाहेर पडणे कठीण होत आहे.वर्षात सर्वाधिक तापमान मे महिन्यात राहते. मात्र, यावर्षी अधूनमधून अवकाळी पाऊस पडत आहे. परिणामी, आजपर्यंत उन्हाळ्याचा ताप अमरावतीकर नागरिकांना सहन करावा लागला नाही. दोन दिवसांपूर्वी जिल्ह्याच्या बहुतांश भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे उकाड्यापासून नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला होता. आता मात्र आकाश थोडे निरभ्र झाले असून, कडक ऊन पडत आहे. पाऊस व कडक ऊन यामुळे वातावरणात दमटपणा निर्माण झाला आहे. १८ व १९,२०मे रोजी असा उकाडा जाणवत होता.

मे महिन्याच्या २५ तारखेपासून रोहिणी नक्षत्राला सुरुवात होणार आहे. या कालावधीत तापमान अधिक राहात असल्याने २५ तारखेनंतरच्या नऊ दिवसांना नवतपा म्हटले जाते. या नवतपांमध्ये तापमान ४२ अंशाच्या वरच राहते. त्यामुळे या कालावधीत विशेष काळजी घेण्याची गरज आहे.विशेष म्हणजे, याच कालावधीत शेतकरी शेतीच्या कामांना सुरुवात करतात व दमट वातावरण सुध्दा निर्माण झाले असते. त्यामुळे तब्येत बिघडण्याचा धोका असतो.



### तब्येती सांभाळा

दमट वातावरणामुळे तब्येत बिघडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी सावध असणे आवश्यक आहे. अतिशय आवश्यक काम असेल तरच घराबाहेर पडावे. दुपारच्या उन्हात कष्टाची कामे टाळावी. अन्यथा उष्माघात होण्याची शक्यता असते. उष्माघाताची लक्षणे दिसून आल्यास रुग्णाला तत्काळ लगतच्या रुग्णालयात भरती करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. प्रत्येक रुग्णालयात उष्माघात कक्ष निर्माण करण्यात आला आहे. डॉक्टरांनाही योग्य त्या सूचना दिल्या आहेत.

# सुरक्षा भिंती नसल्याने नाला खचला ४५ वर्षापासूनचा नागरिकांचा रस्ता झाला बंद

## सुरक्षा भिंतीसाठी निधी मंजूर मात्र सुरुवात नाही : मिलिंद बांबल करणार आत्मदहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

स्थानिक पन्नालालनगर मोठ्या नाल्याला सुरक्षा भिंती नसल्याने खचला असून नागरिकांचा ४५ वर्षापासून असलेला येण्या – जाण्याचा रस्ता बंद झाला आहे शेकडो नागरीक महिला , जेष्ठ नागरीक , युवक यांना येण्या – जाण्यासाठी हाच मुख्य रस्ता आहे .हा रस्ता नाल्याच्या बाजूने पूर्ण खचला असून मोठे खड्डे त्याला पडले आहे त्यामुळे रस्ता केव्हाही खाली येवून पडू शकतो आणी एखादी मोठी दुर्घटना होउन जीवितहानी होण्याची शक्यता आहे . नाल्याच्या दोन्ही बाजूंनी सुरक्षा भिंती नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात नाल्याकाठील नागरिकांना अक्षरश्या जीव मुठीत घेऊन राहावे लागते .



काही महिन्यापूर्वी माजी स्थायी समिती सभापती मिलिंद बांबल यांनी नाल्यात उतरून आक्रमक आंदोलन केले होते आणि सातत्याने आक्रमक पाठपुरावा केल्यामुळे मनपाने पन्नालालनगर येथील चंदू सोजतीया यांच्या घरापासून ते पप्पू गहलोद यांच्या घरापर्यंत सुरक्षा भिंत बांधली पन पप्पू गहलोत ते रवी शेंडे यांच्या घरापर्यंत खचलेला नाला दुरुस्त केला नाही त्यामुळे अनियंत्रित झालेला साहित्याने भरलेला लोडेड ट्रक नाल्यात कोसळला आणी पन्नालालनगर रस्ता पुन्हा बंद झाला मिलिंद बांबल स्थायी समिती सभापती असतांना ( सन :- २०१६-१७) शहरातील सर्व नाल्यांना दोन्ही बाजूंनीसुरक्षा भिंती बांधण्यात याव्या यासाठी आमसभेत आणी स्थायी समितीमध्ये ठराव पारित करून शहरातील १६ मोठेनाले आणी १८ उपनाले यांना दोन्ही बाजूंनी सुरक्षा भिंती बांधण्यासाठी पुण्याच्या युनिटी कंसल्टंट कंपनीने ३७५ करोड ८० लक्ष रुपयाचा उझठ ( डि.पी.आर ) तयार केला होता पन त्यानंतर त्यावर काही कार्यवाही मनपाने केली नाही . सुरक्षा भिंती नसल्याने नाला दोन्ही बाजूंनी खचत चालला आहे त्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे काही दिवसा अगोदर नाला खचल्यामुळे पन्नालालबगीच्या येथील पवन बागडी , रामेश्वर रौरासे ,प्रेमलता राठी तर गरीबनगर येथील पंचफुलाबाई इंगोले यांच्या घरमागील भिंती ( वॉल कंपाउंड )नाल्या खचल्यामुळे पडल्या आहे त्यांना सुध्दा काहीच मदत मिळाली नाही त्यांना सर्वांना मदत करण्यात यावी त्याचप्रमाणे नुकत्याच पन्नालालनगर येथील पप्पू गहलोद यांच्या घरापासून ते रवी शेंडे यांच्या घरापर्यन्त नाला खचल्यामुळे नागरिकांचा पन्नालालनगर रस्ता बंद झाला आहे

तरी तातडीने पन्नालालनगर येथील पप्पू गहलोद ते रवी शेंडे यांच्या घरापर्यंत नाल्याला सुरक्षा भिंत बांधून नागरिकांचा येण्या- जाण्याचा पन्नालालनगर रस्ता सुरू करण्यात यावा या मागणीसाठी मिलिंद बांबल यांनी आक्रमक पवित्रा घेतलानंतर गहलोत ते रवी शेंडे यांच्या घरापर्यंत नाल्याला सुरक्षा भिंत बांधण्यासाठी ४९ लाख ८० हजार रुपये मंजूर केले पन अजूनपर्यंत कामाला सुरुवात झाली नाही तरी या कामाला प्राधान्याने सुरुवात करावी अन्यथा नागरिकांच्या सुरक्षेसाठी मनपा आवारात आमरण उपोषण वेळ पडल्यास आत्मदहन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही असा इशारा माजी स्थायी समिती सभापती आणी संघर्ष युवक संघटनेचे संस्थापक मिलिंद बांबल यांनी मनपा आयुक्त सचिनजी कलंत्रे यांना दिलेल्या निवेदनात केली आहे

# अंगणवाडी केंद्राद्वारे 'पोषण ट्रॅकर'ची प्रभावी अंमलबजावणी करा

## डेप्युटी सीईओ विलास मारसाळे यांच्या सूचना : येवदा येथे अंगणवाडी सेविकांशी संवाद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०दर्यापूर

अंगणवाडी केंद्राद्वारे गुणवत्तापूर्ण व प्रभावी शिक्षणासाठी पुढील काळात इंग्रजी माध्यमाचे शिक्षण सुरू केले जाणार आहे.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांचा तसा मानस असून त्यासाठी प्रयत्न होतं आहेत. तत्पूर्वीच अंगणवाडी केंद्रातील इतर कामे प्राधान्यक्रमाने पूर्ण करावी, पोषण ट्रॅक्टरची प्रभावी अंमलबजावणी करावी अशा सूचना जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास मरसाळे यांनी अंगणवाडी सेविकांना दिल्या. दर्यापूर तालुक्यातील



येवदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात महिला व बालकल्याण विभागाच्या अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिका, सुपरवायझर यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संवाद साधताना विलास मरसाळे हे बोलत होते. यावेळी शुभम बायस्कार, बाल विकास प्रकल्प अधिकारी प्रशांत आढाव, नकुल सोनटक्के, संजय वाघमारे, माला डोईफोडे, मनोज पाथरकर, पंकज कान्हेरकर, सतीश टोलमारे, मयूर वांदे, नितीन बडे, दिनेश मुंडाले, प्रेमसागर आसरे, अशोक हागोने, विनोद निमकर, वैशाली पवार, चंद्रकला खेडकर, प्रशांत तांबडे यांच्यासह अन्य उपस्थित होते.दरम्यान उपमुख्य कार्यकारी अधिकारी विलास मरसाळे यांनी महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेतला. अंगणवाडी मधील प्राथमिक, भौतिक आणि मूलभूत सोईसुविधा विकसित करण्यासाठी देखील शासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कुपोषण निर्मूलन, बालमृत्यू, माता मृत्यू याचाही आढावा दरम्यान घेण्यात आला. स्तनदा माता, अंगणवाडी केंद्रातील बालक यांच्यासाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात जिल्हा प्रशासनाला अभूतपूर्व यश प्राप्त झाले आहे. सर्व विभागांमध्ये समन्वयाने काम सुरू असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्या नेतृत्वात हे यश प्राप्त होऊ शकल्याचे देखील विलास मरसाळे यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचालन पर्यवेक्षिका पायल पवार यांनी तर आभार सुनिता राऊत यांनी मानले.

# पावडरने पिकविलेले आंबे खाल तर आरोग्य बिघडणार

## आमरसही धोकादायक : नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०अमरावती

बाजारपेठेत फळांचा राजा फेब्रुवारीतच दाखल झाला आहे. फळात पिकण्याची योग्य ती नैसर्गिक प्रक्रिया होण्याआधीच कार्बाइडने पिकवून बाजारात आणलेले आंबे मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यावर ग्राहक भर देत आहेत. त्यामुळे नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खरेदी करूनच त्याचा आमरस खा, अन्यथा मोठ्या प्रमाणात आमरस खाणे आरोग्यास हानिकारक आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. यंदा फेब्रुवारीमध्येच केसर, बैगनपल्लीसह अन्य आंबे



बाजारात दाखल झाले आहेत. परंतु, नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे बाजारात कमी प्रमाणात आहेत. त्यामुळे गावरान आंबे सध्यातरी महाग मिळत आहे. हे कलमीआंबे कार्बाइडने पिकवून बाजारात आणलेली असतात. त्यामुळे हे आंबे खाल्ल्यानंतर त्याचे आरोग्यावर अनेकवेळा वाईट परिणाम होत असतात. म्हणूनच ग्रामीणमध्ये नैसर्गिक पद्धतीने पिकविलेले आंबे खाण्यावर भर दिला जातो.दिवसेंदिवस गावरान आंब्यांचे प्रमाण कमी होत आहे. आजकाल प्रत्येकाला झटपट फळं लागणारी झाडे हवी आहेत. त्यामुळे कलमी आंब्यांचे प्रमाण वाढले आहे. यात गावरान आंबे उशिरा येतात. त्यामुळे कार्बाइडने पिकविलेले आंबे बाजारात दाखल झालेले असतात. शहरी भागातील नागरिक सुरुवातीला त्यावरच ताव मारतात.

# पावसामुळे नांदगाव पेठ परिसरातील शेतकऱ्यांचे विद्युत उपकरणे जळाली

## नितीन हटवार यांची नुकसान भरपाईची मागणी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०नांदगाव पेठ

मागील दोन-तीन दिवसांपासून नांदगाव पेठ परिसरात सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे विद्युत उपकरणे जळून खाक झाली आहेत. विजांच्या कडकडाटामुळे व विद्युत तारांवर आलेल्या झाडांच्या फांद्यांमुळे वादळात तारांचा परस्पर स्पर्श होऊन हाय व्होल्टेज निर्माण झाले. यामुळे अनेक शेतकऱ्यांचे स्टार्टर, विद्युत मोटर पंप आणि अन्य कृषी उपकरणे खराब झाली. या घटनेमुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर आणखी आर्थिक संकट कोसळले आहे.वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळेच हा प्रकार घडला असल्याचा आरोप करत माजी जिल्हा परिषद सदस्य व शिवसेना तालुका प्रमुख नितीन हटवार यांनी शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती अंतर्गत नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, विद्युत विभागाने वेळेवर झाडांची छाटणी केली असती तर ही हानी टाळता आली असती. येथील शाखा अभियंत्यांनी तातडीने सर्वेक्षण करून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची यादी संबंधित विभागाकडे सादर करून त्यांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# दर्यापुरात सुरू आहे सुर संगम कार्यक्रमाची वसुली

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०दर्यापूर

या अगोदर कित्येक वर्ष अगोदर दर्यापुरात पोलीस कल्याण निधी नावाने कार्यक्रमाचे आयोजन केले जात होते व त्या माध्यमातून दर्यापुरातून वसुली केल्या जात होती मात्र अनेक दहा वर्षा अगोदरपासून वसुली बंद झाली मात्र पुन्हा यावर्षी सुर संगम नावाचा कार्यक्रम आयोजित पोलीस विभागातर्फे करण्यात आला आहे हा कार्यक्रम अमरावती येथे आयोजित केला असून त्याची वसुली मात्र दर्यापूर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये होत असून ५०० आणि १००० रुपये तिकीट दर आहे. पोलीस कल्याण निधी या सदराखाली पोलीस विभागातर्फे आयोजित करण्यात आला आहे. या सुर संगम आर्केस्ट्रा मध्ये दर्यापूरचे सुपुत्र हास्य सम्राट भारत गणेशपुरे , कुशल बद्रिके, माधुरी पवार, अमय दाते, आधी कलाकार या सुर संगम कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन कार्यक्रम सादर करणार आहेत तरी प्रत्येक नागरिकांनी या कार्यक्रमात सहभाग व्हावा या उद्देशाने सहकार्य करावे असे आवाहन अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# आश्वासन समितीची पहिली बैठक ३२ विभागाचे ३३४३आश्वासन पेंडिग

## राज्यातील जनतेची विषयाला प्राधान्य देऊन न्याय मिळवून देणार : अध्यक्ष आ. रवी राणा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२०मुंबई

आश्वासन समितीची पहिली बैठक पार पडली त्या मध्ये सोमवारी मध्यवर्ती सभागृह येथे समिती कक्ष आयोजीत केलेल्या बैठकीत आ.रवि राणा हे समिती प्रमुख यांचे उपस्थितीत पार पडली तर या समितीचे एकुण १८ आमदार हे समितीचे सदस्य आहेत

इतीवृत्तामध्ये असलेल्या एकुण खालील प्रमाणे आ.रवि



राणा घेणार. पहिल्याच दिवशी समिती समोर ३२ विविध विभागाच्या पेंडिग ३३४३असलेल्या आश्वासन विषयी राज्यातील जनतेची विषयाला प्राधान्य देऊ सर्व सामान्य नागरीकांचे हित बघता कामकाज करणार या संबंधाने सर्व सत्य माहिती अध्यक्ष समोर व सदस्यांनसमोर समितीच्या अधिकाऱ्यांनी ठेवावी.जेणेकरून महाराष्ट्रातील सर्व सामान्य जनतेचे सर्व प्रश्न तात्काळ मार्गी लावुन त्यांना लवकरात लवकर न्याय कसा देता येईल यासाठी नगरविकास विभाग महसूल विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागा चे आश्वासन प्रलंबित आहे त्या बाबत वाचन संबंधित अधिकाऱ्यांन सोबत सर्व माहिती घेऊन संमतीच्या दिनांक २८/०५/२०२५ बैठकीत ठेवावे असे आदेश आश्वासन संमतीचे अध्यक्ष आमदार रवि राणा यांच्या कडून देण्यात आले यावेळी समितीचे शासकिय प्रमुख राजेश तारवी सह सचिव, तथा विशेष कार्य अधिकारी, समितीचे कक्षअधिकारी पवन मातरे, संसदीय समिती अधिकारी आदी उपस्थित होते.

# लढायचे निश्चित; पक्ष, प्रभाग, पॅनल तळ्यात मळ्यात

## महापालिकेसाठी इच्छुकांची चाचपणी : मतदारांना नव्या चेहऱ्यांची ओळख




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आगामी चार महिन्यांत होणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर आता महापालिकेत नगरसेवक होण्याची स्वप्नं पाहणाऱ्या इच्छुकांनी लढायचे निश्चित केले आहे; परंतु अद्याप प्रभाग रचना झालेली नाही, तर दुसरीकडे संभाव्य निवडणुकीसाठी प्रभाग निश्चित करताना मतदारांच्या संख्येवर आणि मतांच्या जुळवाजुळवीसाठी अवलंबून फॅक्टरसह विजयश्री खेचून आणण्यास तगडे पॅनल व उमेदवार यांचाही ताळमेळ लावण्याचे काम सुरू आहे.

कोणत्या पक्षाकडून आणि नेत्याला साकडे घालून तिकीट खेचून आणायचे, अशा एक ना अनेक प्रश्नातच इच्छुकांचे तळ्यात मळ्यात सुरू आहे. यामुळे आहे त्या मतदारांशी संपर्क साधून इच्छुकांची चाचपणी सुरू आहे. त्यामुळे या निवडणुकीला आगामी काळात रंगत चढणार आहे.सन २०२२ पासून महापालिकेवर प्रशासक राज सुरू झाले. या तीन वर्षाच्या कालावधीत निवडणुका कधी होतील, याची प्रतीक्षा संभाव्य उमेदवारांना लागली होती. अखेर ही प्रतीक्षा काही दिवसांपूर्वी संपली आहे. ४ महिन्यांत निवडणुका घेण्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केल्यानंतर निवडणुकीच्या अनुषंगाने इच्छुकांच्या तयारीला वेग आला आहे.नवीन प्रभाग झाल्यास निवडणूक आयोगाकडून नवीन मतदारयादी बनविणे, नवीन मतदारांची नावे समाविष्ट करणे आणि त्यानंतर अंतिम मतदार यादीच्या अनुषंगाने नवीन प्रभाग रचना तयार करणे, या कामास बराच वेळ वाया जाणार आहे.

### मतांच्या झोळीसाठी इच्छुक दारोदारी....

मागील काही वर्षात निवडणूक होण्याची चिन्हे नसल्याने संभाव्य उमेदवार गायब झाले होते. काही मोजकेच माजी नगरसेवक हे नेहमीच सक्रिय राहून नागरिकांच्या अडीअडचणीत तसेच प्रभागातील विविध विकासकामे आणि निधी आणून काहीतरी बदल घडविण्याचा प्रयत्न करीत होते. मात्र, आता एक किंवा दोन प्रभाग निश्चित करून तेथे मतदारांना संपर्क साधून इच्छुकसुद्धा मतांच्या झोळीसाठी दारोदार फिरत आहेत. त्यामुळे मतदारांनाही नव्या चेहऱ्यांची ओळख होत आहे.

### प्रमुख पक्षांकडे इच्छुकांची वाढली गर्दी

यंदाच्या महापालिका निवडणुकीमध्ये अजून प्रत्येक पक्ष स्वतंत्र लढणार की, वेगवेगळ्या लढणार याबाबत कुठलीही स्पष्टता नसली तरी प्रत्येक पक्षाने आपापली तयारी सुरू केली आहे. त्यामध्ये प्रमुख पक्षांकडे मोठ्या संख्येने इच्छुक म्हणून पुढे येत असल्याचेही दिसत आहे. बहुतांश पक्षांकडे इच्छुकांची गर्दी वाढली आहे.

### प्रभाग रचनेवर गणित अवलंबून

अमरावती महापालिकेची २०२२ मध्ये मुदत संपली. तेव्हापासून इच्छुक निवडणुकीची वाट बघत आहेत; मात्र आता प्रभाग रचना कशी राहील, नव्याने होईल, की जुनीच प्रभाग रचना यावेळीही राहील. याबाबत संभ्रम कायम आहे. नवीन प्रभाग रचना झाल्यास निवडणुकीला उशीर होणार आहे.

# विवाह सोहळ्याचा खर्च लागला वाढू; आता कर्ज किती काढू?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**



दहा-पंधरा वर्षांपूर्वी केवळ दोन-पाच लाखांत होणारा विवाह समारंभ आता महागाईच्या विळख्यात सापडला आहे. या सोहळ्यांच्या बदलल्या ट्रेंडमुळे हा खर्च २० ते २५ लाखांचा आकडा पार करत आहे. त्यात महागाईच्या भडक्यामुळे हा खर्च गेल्या काही वर्षांपेक्षा तब्बल पंधरा ते वीस टक्क्यांनी वाढला आहे. चंद्रपूर जिल्हा औद्योगिक जिल्हा आहे. चंद्रपूर शहरातील बहुतांश नागरिक नोकरीनिमित्त वास्तव्य करत आहेत. त्यामुळे बहुतांश जणांजवळ बऱ्यापैकी पैसा आहे. काही जण इकडून तिकडून जमा करूनही लग्नसमारंभ धूमधडाक्यात करत असल्याचे दिसून येते. लग्नाच्या बदलत्या ट्रेंडमुळे लग्न खर्चात नेमकी काट-छाट कुठे करावी, याचा ताळमेळ बसताना दिसत नाही. महागाईच्या चटक्यांमुळे वधू-वरांचे माता-पिता विवंचनेत आहेत.

### महागाईमुळे बॅण्डबाजा आता वाजणार तरी कसा ?

बॅण्डबाजा व बग्गीतही १० ते १५ टक्के दरवाढ झाली आहे. दूध, पनीर, मिठाई, फुले, कपडे, केटरिंग, फ्लॉवर डेकोरेशन, बॅण्ड पथक, डीजे, ऑर्केस्ट्रापर्यंत सवचिच भाव वाढल्याने लग्नाचे अर्थकारण कोलमडल्याचे वधू-वर पिता सांगत आहेत.

### केटरिंग, बॅण्डही महागले

केटरिंग पासून बॅण्ड-बाजावरही अधिकचा खर्च करावा लागत आहे. गतवर्षी १३० रुपये प्लेट मिळणारी भोजन थाळी यावेळी २०० रुपयांवर पोहोचली. पूर्वी बॅण्ड पथकाची बुकिंग २० हजार रुपयांपर्यंत होत होती. त्यासाठी आता ३० हजार ३५ हजार रुपयांपेक्षा अधिक खर्च होतो.

### कपड्यांची दरवाढ

लग्नाचे बजेट वाढवण्यात वर-वधूसाठी आवश्यक साहित्य महत्वाची भूमिका पार पाडत आहेत. सोन्याचे दर वाढल्याने दागिन्यांवरही अधिक खर्च करावा लागतो. गतवर्षीच्या तुलनेत कपडांच्या दरात १० टक्के दरवाढ झाली. एकंदरीत यावेळी लग्नाचा वाढीव खर्च वर-वधू दोन्ही पक्षांना आर्थिक संकटात टाकण्याचे काम करत आहे.

### फुले महागली; सजावटीसाठी लाखोंचा खर्च

अवकाळीमुळे यंदा फुलांचे उत्पादन कमी आहे.परिणामी, त्यातही दरवाढ दिसून येत आहे. मागील वर्षीच्या तुलनेत फुलांच्या सजावटीसाठी फुलांवरील खर्च यावेळी वाढला आहे. यासोबतच मजुरीतही वाढ झाली. कुशल कामगाराचे शुल्कही पाचशे रुपये आणि अकुशल कामगारांना चारशे रुपये द्यावे लागतात. वाहतुकीचा खर्चही वाढला आहे. विवाह समारंभात उपयोगात येणाऱ्या खुर्चीपासून स्टेज, तंबू आदींच्या भाड्यातही मोठी वाढ झाली आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा ८६०५९४८८५३

# नव्या सत्रात स्कूल बस अन् खासगी व्हॅनची भरमसाठ भाडेवाढ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

शालेय विद्यार्थ्यांची शाळेत ने-आण करणाऱ्या खासगी स्कूल बससाठी नियमावली निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये विद्यार्थी सुरक्षेपासून परवान्यासह विविध बार्बीचा समावेश आहे. मात्र, अमरावती शहरात शासनाच्या या नियमावलीचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून काही शाळांनी तसेच खासगी व्हॅनधारकांनी विद्यार्थी वाहतुकीच्या भाडेदरात अवाजवी वाढ केली आहे. शिवाय काही स्कूल बस आणि खासगी व्हॅनमध्ये क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी बसवून वाहतूक केली जाते. मात्र, या गंभीर प्रकाराबाबत व शिक्षण विभाग उदासीन असल्याचे दिसून येत आहे.विद्यार्थ्यांना शाळेत नेण्यासाठी खासगी संस्थांमार्फत अनेक स्कूल बसेस चालविण्यात येतात. या स्कूल बसच्या माध्यमातून अनेक संस्थाचालक पालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे येत्या शैक्षणिक खासगी बसेससाठी नियमावली करण्यासाठी नेमण्याचा वर्षापासून स्कूल नवी निश्चित समिती निर्णय शासनस्तरावर झाला. तसेच या संदर्भात सन २०११ मध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने ज्या उपाययोजना सुचवल्या होत्या, त्या विचारात घेतल्या जाणार आहेत.

### ई- रिक्षाचेही वाढले भाडे

१)ई – रिक्षाच्या प्रवाशाला इंधन लागत नाही. चार्जिंग केलेल्या बॅटरीवर या रिक्षा चालतात. शहरातील ई-रिक्षा चालकांनीही यंदा विद्यार्थी वाहतुकीचे दर वाढवले आहेत. ई- रिक्षाव्दारे होणाऱ्या विद्यार्थी वाहतुकीवर आरटीओ व शिक्षण विभागाचे नियंत्रण नसल्याचे दिसते.

२) या सर्वकष अहवालाच्या आधारे नवीन शैक्षणिक ३ वर्षापासून स्कूल बसेससाठी नियमावली निश्चित करण्यात आली आहे. असे असतानाही शहरात स्कूल बस व खासगी व्हॅनधारकांच्या मनमानीकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. दुसरीकडे पालक त्रस्त झाले आहेत.

### १० महिने शाळा; मग १२ महिन्यांचे शुल्क कसे ?

शैक्षणिक वर्षाच्या एकूण कालावधीपैकी १० महिने या स्कूल बसेस विद्यार्थी वाहतूक करतात; परंतु काही शाळा पूर्ण वर्षाचे शुल्क आकारतात. तसेच शालेय शुल्क आणि स्कूल बस शुल्क एकाचवेळी आकारले जात असल्याने त्याचा मोठा आर्थिक बोजा पालकांवर पडतो, अशा पालकांच्या तक्रारी आहेत.त्यामुळे संबंधित स्कूल बसचालकांनी १२ महिन्यांऐवजी केवळ १० महिन्यांसाठीचे विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क एकाचवेळी न आकारता दर महिन्याला स्वीकारावे, अशी मागणी पालकांकडून होत आहे.

# शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी 'साथी' ऑनलाइन नोंदणीनंतरच आता विकता येणार बियाणे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**




शेतकऱ्यांची अनेकदा बियाणे खरेदीतून फसवणूक होते.बियाणे उगवून न आल्यास शेतकऱ्यांच्या तक्रारी येतात. त्यामुळे त्यांची फसवणूक होऊन आर्थिक नुकसान होते. ते टाळण्यासाठी बनावट, कालबाह्य आणि अनधिकृत बियाण्यांच्या विक्रीस प्रतिबंध घालण्यात येऊन बियाणे विक्रीतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कृषी विभागाकडून देण्यात येणारे सत्यप्रत बियाणे आता साथी पोर्टलवर नोंदणी करूनच दिले जाणार आहे.त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक टळून ते चढ्या दराने विकता येणार नाही आणि बोगसगिरीही करता येणार नसून गैरप्रकारांना चाप बसणार आहे. शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना त्यांची फसवणूक झाल्याच्या अनेक तक्रारी यापूर्वी कृषी विभागाकडे दाखल झाल्या आहेत. त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी कृषी विभागाकडून अनेक उपाययोजना राबविल्या जात आहेत. त्याद्वारे नियंत्रण आणण्यात यशही आले आहे. मात्र, तरीही काही ठिकाणी बियाणे बोगस लागल्याच्या तक्रारी दाखल होत आहेत. त्याचा विचार करून कृषी विभागाने आता शेतकऱ्यांच्या बियाण्यांच्या बाबतीत तक्रारीच येऊ नये, त्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी स्वतंत्र प्रणाली कार्यान्वित केली आहे.

बियाणे कंपन्यांसाठी बंधनकृषी विभागाने बियाण्यांसाठी काही बंधने घातली आहेत. त्यासाठी कृषी विभागाने काही गुणवता निकष लागू केले आहेत. बियाण्यांची उगवणक्षमता, टक्केवारी, शुद्धता आणि आर्द्रता ही कृषी विभागाने निश्चित केलेल्या मानांकनानुसार असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बियाण्यांसाठी आवश्यक ते माहितीचे लेबलिंग करणे गरजेचे आहे.

बियाणे विक्रीवर नियंत्रणशेतकऱ्यांना देण्यात येणारे सत्यप्रत बियाणे आता साथी पोर्टलवर नोंदणी करूनच दिले जाणार आहे. त्यामुळे उत्पादक कंपनीपासून तयार झालेल्या बियाण्यापासून ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यापर्यंतच्या प्रक्रियेवर आता कृषी विभागाचे नियंत्रण राहणार आहे. त्यासाठीची सिस्टिम तयार केली आहे.

# ज्येष्ठांसाठी व्यथा, वेदना, तक्रारींसाठी आता 'एल्डर लाईन' मदतीचा आधार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**



'घरात आम्ही दोघं एकटेच, मुलगा परदेशात आहे', 'नातेवाइकांनी आमचं घर बळकावलंय', 'कुटुंबात कुणाशी बोलणंच होत नाही' अशा असंख्य व्यथा, वेदना, तक्रारी महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांना 'एल्डर लाईन' हेल्पलाइनवर मोकळेपणाने मांडता येणार आहे.

ज्येष्ठांना मदतीसाठी '१४५६७' ही 'एल्डर हेल्पलाइन' सुरू करण्यात आली. गरजूंना त्याचा मोठा लाभ होईल. ज्येष्ठ नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. उतार वयात ज्येष्ठांच्या समस्या ऐकून घेत त्या सोडवण्यासाठी पुणे उपलब्ध होत नाहीत.

ज्येष्ठांची ही अडचण लक्षात घेऊन शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारचे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था आणि राज्य सरकारच्या सहकार्याने ज्येष्ठांसाठी 'एल्डर हेल्पलाइन' सेवा देशभरातील सर्व राज्यात आणि केंद्रशासीत प्रदेशात सुरू करण्यात आली आहे.पुणे येथील जनसेवा फाउंडेशन यांच्यामार्फत ही सेवा महाराष्ट्रात राबवली जाते. मानवसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन जनसेवा फाउंडेशन गेली ३७ वर्षांपासून सातत्याने विविध प्रकल्पाद्वारे गरीब, आजारी, वृद्ध, अपंग, निराधार, गरीब मुले-मुली आणि महिला यांची सेवा करीत आहेत. जनसेवा फाउंडेशनला संयुक्त राष्ट्रसंघाचा विशेष दर्जा प्राप्त आहे.

### ३० हजारांवर प्रकरणात क्षेत्रीय पातळीवर मदत

१४५६७ राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाइनवर आतापर्यंत ४ लाखांहून अधिक कॉल्स आले असून, ३० हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष मदत करण्यात आली आहे. हेल्पलाइनद्वारे आरोग्य, पोषण, निवारा, आश्रयगृह व वृद्धाश्रम, डे केअर सेंटर याची माहिती प्राप्त होईल. कायदेविषयक, मालमत्ता व कौटुंबिक वादांमध्ये मोफत कायदेशीर सल्ला, पेन्शन योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम २००७ यावर देखील मार्गदर्शन केले जाणार आहे. मानसिक आजार व चिंता, ताण, राग आदींचे व्यवस्थापन करून भावनिक आधार दिला जाईल. बेघर व अत्याचारग्रस्त वृद्धांसाठी मदत आणि पुनर्वसन, कुटुंबीयांशी संवाद, पुनर्स्थापनेसाठी प्रयत्न, पोलिस प्रशासनाशी समन्वय, समुपदेशन केले जाणार आहे.

# कर्जमुक्तीच्या आश्वासनापासून दूर पळाल तर नरडीचा घोट घेऊ! स्वाभीमानी शेतकरी संघटना आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नांदेड**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रविकांत तुपकर यांनी राज्यातील महायुती सरकारला निर्वाणीचा इशारा देत निवडणुकीआधी शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमुक्तीच्या आश्वासनाची पूर्तता करा, नाहीतर नरडीचा घोट घेऊ, असा दम भरला. सरकारकडे पैसे नाही म्हणता, मग आमदार- खासदार, अधिकाऱ्यांचे पगार करायला पैसे कुठून येतात? पाच वर्षासाठी ते बंद का करत नाही? असा सवालही तुपकर यांनी केला.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर नांदेडमध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची बैठक रविकांत तुपकर याच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना ते चांगलेच आक्रमक झाले होते.



महाराष्ट्रातला शेतकरी मरणाच्या दारात उभा आहे, सरकार मात्र आपल्या मस्तीत मश्गुल असल्याचा आरोप रविकांत तुपकर यांनी केला. निवडणुकीपूर्वी महायुतीने शेतकर्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते ते त्यांना पाळावेच लागेल. त्यापासून दूर पळण्याचा प्रयत्न जर सरकारने केला तर आम्ही त्यांच्या नरडीचा घोट घेतल्याशिवाय राहणार नाही.

आम्ही सगळी शेतकर्यांची पोरं आता एका निर्धारने बाहेर पडलो आहोत. गावा गावात आम्ही किसान आर्मी उभी करणार असून जो मंत्री, आमदार, खासदार, लोकप्रतिनिधी शेतकर्यांना त्रास देईल त्यांना आक्रमकपणे धडा शिकवला जाईल. शेतकर्यांच्या मालाला हमीभाव द्या, कर्जमुक्तीचे आश्वासन पूर्ण करा, ज्या भागामध्ये शेतकर्यांच्या ऊसाचे पैसे कारखान्यांनी दिले नाही ते तातडीने द्या, कांद्याला दोन हजार रुपये भाव, दुधाला अनुदान द्या, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

